दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज
सोशल मीडियाच्या
माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील
लोकप्रिय दैनिक



• वर्ष : ०४ • अंक : ०५१ • पुणे • शनिवार, दि. ३१ ऑक्टोबर २०२६ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313

दोस्तीत कुस्ती नको : एकनाथ शिंदे

मित्र पक्षांवर टीका न करण्याचे एकनाथ शिंदे यांचे आदेश

- भाजपकडून होणाऱ्या टीकेवर आनंद परांजपेंचा नाराजीचा सूर
- महायुतीत समन्वय वाढवण्याची अपेक्षा, संजय गायकवाड यांच्या वक्तव्यावर कारवाईचे संकेत

ठाणे (दै. आरंभ पर्व)

राज्यातील राजकारणात महायुतीतील घटक पक्षांमध्ये सुरू असलेल्या आरोप-प्रत्यारोपांच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेचे मुख्य नेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या पक्षातील नेते आणि प्रवक्त्यांना महत्त्वाचे निर्देश दिले आहेत. मित्रपक्षांवर सार्वजनिकरीत्या टीका करणे टाळावे, एकमेकांविरोधात वक्तव्ये करून युतीमध्ये कटुता निर्माण करू नये, असे स्पष्ट आदेश शिंदे यांनी दिल्याची माहिती शिवसेनेचे प्रवक्ते आनंद परांजपे यांनी दिली. 'दोस्तीत कुस्ती नको' अशी भूमिका घेत शिंदे यांनी पक्षातील नेत्यांना संयम राखण्याचा सल्ला दिला आहे. मात्र, मित्रपक्ष भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसनेही याच भूमिकेचे पालन करावे, अशी अपेक्षा परांजपे यांनी व्यक्त केली.

राज्यातील विधान परिषद निवडणुकीच्या निकालानंतर महायुतीतील भाजप आणि शिवसेना या दोन प्रमुख घटक पक्षांमध्ये राजकीय वातावरण तापले आहे. निवडणुकीच्या निकालावरून तसेच परस्परांच्या



राजकीय भूमिकांवरून दोन्ही पक्षांतील नेते आणि प्रवक्ते एकमेकांवर टीका करताना दिसत आहेत. या पार्श्वभूमीवर महायुतीतील अंतर्गत मतभेद सार्वजनिक व्यासपीठावर मांडले जाण्याऐवजी ते चर्चेच्या माध्यमातून सोडवावेत, असा प्रयत्न शिवसेनेकडून होत असल्याचे परांजपे यांच्या वक्तव्यावरून स्पष्ट झाले आहे. याबाबत बोलताना आनंद परांजपे म्हणाले की, शिवसेना मुख्य नेते एकनाथ शिंदे यांनी पक्षातील कोणत्याही नेत्याने किंवा प्रवक्त्याने मित्रपक्षावर टीका करू नये, असे स्पष्ट आदेश दिले आहेत. महायुतीतील घटक पक्षांनी एकमेकांचा सन्मान राखणे आवश्यक आहे. मात्र, भाजपच्या काही प्रवक्त्यांकडून शिवसेनेवर ज्या भाषेत टीका केली जात आहे, ती योग्य नाही. प्रत्येक पक्षाच्या नेत्यांनी आणि प्रवक्त्यांनी आपल्या भाषेच्या मर्यादा पाळल्या पाहिजेत. शिवसेनेकडून संयमाची भूमिका घेतली जात असेल, तर मित्रपक्षांनीही त्याच पद्धतीने वागणे अपेक्षित आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. महायुतीमध्ये केवळ निवडणुकीपुरते एकत्र येणे पुरेसे नसून सरकार चालवताना आणि राजकीय पातळीवरही परस्परांमध्ये विश्वास व समन्वय असणे गरजेचे आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि दुसरे उपमुख्यमंत्री यांच्यासह महायुतीच्या प्रमुख नेत्यांची बैठक होईल, त्यावेळी या विषयावर चर्चा होण्याची शक्यता आहे. पक्षांमधील समन्वय अधिक मजबूत करण्यावर या बैठकीत भर दिला जाईल, असेही परांजपे यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या कार्यक्रमातील भाषणात दोन्ही शिवसेनेचे आमदार रवींद्र धंगेकर यांनी मांडलेली भूमिका ही त्यांची व्यक्तिगत भूमिका असू शकते. मात्र, ती पक्षाची अधिकृत भूमिका नाही, असेही त्यांनी ठामपणे सांगितले. गायकवाड यांच्या वक्तव्याचा निषेध करण्यात आला असून, त्यांच्या विरोधात पक्षांतर्गत कारवाई होण्याचे संकेतही शिंदे यांनी दिल्याचे समजते. शेतकरी हा राज्याच्या अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा घटक असून, त्यांच्या अडचणी आणि भावनांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. त्यामुळे पक्षातील लोकप्रतिनिधींनी सार्वजनिक वक्तव्ये करताना अधिक जबाबदारीने वागणे आवश्यक असल्याचा संदेश या भूमिकेतून देण्यात आला आहे.

प्रदीप पूर्णेकर खूनप्रकरणावरूनही आनंद परांजपे यांनी विरोधकांवर निशाणा साधला. या प्रकरणाचा वापर करून विरोधकांनी पूर्णेकर यांच्या खांद्यावर बंदूक ठेवत शिवसेना आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याविरोधात राजकीय वातावरण तयार करण्याचा प्रयत्न केला, असा आरोप त्यांनी केला. एकनाथ शिंदे हे पूर्णेकर यांच्या भेटीला गेले असते, तर विरोधकांनी त्या भेटीचाही वेगळा राजकीय अर्थ काढला असता. त्यामुळे या प्रकरणाकडे राजकीय चष्म्यातून पाहण्याऐवजी वस्तुस्थितीच्या आधारे पाहणे आवश्यक आहे, असे परांजपे यांनी नमूद केले.

संजय गायकवाड यांच्या वक्तव्यावर शिंदेंची नाराजी?

शेतकऱ्यांविरोधात असंवेदनशील वक्तव्य केल्याचा आरोप असलेले शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांचाही विषय यावेळी चर्चेत आला. शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत कोणत्याही लोकप्रतिनिधीने बोलताना संवेदनशीलता आणि जबाबदारीचे भान ठेवणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांच्या भावना दुखावणारी वक्तव्ये करणे योग्य नाही, अशी भूमिका एकनाथ शिंदे यांनी घेतल्याचे परांजपे यांनी सांगितले.

ठाकरे बंधूंच्या भेटीवरून राजकीय अर्थ काढू नका

दरम्यान, मुंबईत एका पुस्तक प्रकाशन सोहळ्याच्या निमित्ताने ठाकरे बंधू आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट झाल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले होते. या भेटीमुळे भविष्यातील राजकीय समीकरणांमध्ये काही बदल होणार का, याबाबत तर्कवितर्क लढवले जात होते. मात्र, या भेटीचा अनावश्यक राजकीय अर्थ काढण्याची गरज नसल्याचे आनंद परांजपे यांनी स्पष्ट केले.

दिवाळीत ग्राहकांच्या हितासाठी तुकाराम मुंढे मैदानात

मुंबई (दै. आरंभ पर्व)

दिवाळीच्या सणात खाद्यपदार्थांची मोठ्या प्रमाणावर खरेदी-विक्री होत असल्याने ग्राहकांच्या आरोग्याशी कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असा स्पष्ट इशारा अन्न व औषध प्रशासनाचे (FDA) आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दिला आहे. कालबाह्य खाद्यपदार्थांची विक्री रोखण्यासाठी प्रशासनाने विशेष मोहीम हाती घेतली असून, खाद्यपदार्थांच्या पॅकिंगवर एक्सपायरी डेट नमूद करणे बंधनकारक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दिवाळीच्या काळात फराळ, मिठाई आणि इतर खाद्यपदार्थांची मागणी वाढते. या पार्श्वभूमीवर व्यावसायिकांनी खाद्यपदार्थ तयार करताना दर्जेदार तेलाचा वापर करावा, भेसळयुक्त पदार्थ तयार करू नयेत आणि मिठाईमध्ये कृत्रिम रंगांचा अतिवापर टाळावा, असे आवाहन मुंढे यांनी केले. नियमांचे उल्लंघन करून कालबाह्य किंवा भेसळयुक्त पदार्थांची विक्री करणाऱ्यांविरोधात कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी बजावले.

- खाद्यपदार्थांच्या पॅकिंगवर एक्सपायरी डेट बंधनकारक!

सहमतीने ठेवलेले शारीरिक संबंध बलात्कार नव्हे

- सर्वोच्च न्यायालयाचे महत्त्वपूर्ण निरीक्षण
- नाते संपल्यानंतर सूडबुद्धीने फौजदारी गुन्हे दाखल करण्याच्या प्रवृत्तीवर न्यायालयाची चिंता
- संमती आणि फसवणुकीतील फरक स्पष्ट



अयशस्वी प्रेमसंबंधांना गुन्हेगारी स्वरूप देण्याबाबत चिंता

प्रेमसंबंध अपयशी ठरल्यानंतर त्याचे रूपांतर फौजदारी प्रकरणात करण्याच्या प्रवृत्तीबाबत सर्वोच्च न्यायालयाने गंभीर चिंता व्यक्त केली. बलात्कार हा अत्यंत गंभीर स्वरूपाचा गुन्हा असून प्रत्यक्ष लैंगिक हिंसा, बळजबरी किंवा संमती मिळवण्यासाठी केलेली कायदेशीरदृष्ट्या महत्त्वाची फसवणूक अशा परिस्थितीतच या आरोपाचे गांभीर्य लक्षात घेऊन कारवाई होणे आवश्यक आहे, असे न्यायालयाने नमूद केले. परस्पर संमतीने निर्माण झालेल्या संबंधांमध्ये नंतर मतभेद झाल्यामुळे बलात्काराचा आरोप करणे म्हणजे फौजदारी न्यायव्यवस्थेचा अयोग्य वापर ठरू शकतो. त्यामुळे प्रत्येक प्रकरणातील वस्तुस्थिती, संमतीचे स्वरूप आणि फसवणुकीचे आरोप यांची स्वतंत्रपणे तपासणी करणे आवश्यक असल्याचे न्यायालयाने अधोरेखित केले.

नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)

सज्ञान व्यक्तींमध्ये प्रेमसंबंधातून परस्पर संमतीने प्रस्थापित झालेले शारीरिक संबंध केवळ प्रेमसंबंध संपुष्टात आल्यामुळे बलात्काराच्या गुन्ह्यात रूपांतरित होऊ शकत नाहीत, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले आहे. अयशस्वी प्रेमसंबंधांनंतर एकमेकांविरोधात फौजदारी गुन्हे दाखल करण्याच्या वाढत्या प्रवृत्तीबाबतही न्यायालयाने चिंता व्यक्त केली.

न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना आणि न्यायमूर्ती आर. महादेवन यांच्या खंडपीठाने केरळमधील संतोष कुमार एन. पी. यांच्याविरोधातील बलात्कार आणि फसवणुकीचे आरोप रद्द करत त्यांना दिलासा दिला. या प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान न्यायालयाने संमतीने प्रस्थापित झालेल्या संबंधांचा आणि विवाहाचे खोटे आश्वासन किंवा फसवणुकीच्या आधारे मिळवलेल्या संमतीचा विचार स्वतंत्रपणे करण्याची आवश्यकता अधोरेखित केली. न्यायालयाच्या निरीक्षणानुसार, एखाद्या नात्यात दोन्ही सज्ञान व्यक्तींनी स्वेच्छेने शारीरिक संबंध ठेवले असतील, तर नंतर ते नाते संपुष्टात आल्यामुळे पूर्वीची संमती आपोआप अवैध ठरत नाही. केवळ नात्यात दुरावा निर्माण झाला किंवा संबंध संपले म्हणून बलात्काराचा गुन्हा दाखल करणे योग्य ठरणार नाही.

नाते संपल्यानंतर पुरुषाला त्या संबंधातून बाहेर पडण्याचा अधिकार नाही का? भविष्यात बलात्काराचा आरोप होण्याच्या भीतीने एखाद्या व्यक्तीने नात्यात कायम राहावे का? असे प्रश्न उपस्थित करत न्यायालयाने अशा प्रकारच्या आरोपांमुळे व्यक्तीच्या स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठेवर परिणाम होऊ शकतो, असे स्पष्ट केले.

केरळमधील संतोष कुमार एन. पी. यांच्याविरोधात एका महिलेने तक्रार दाखल केली होती. संतोष कुमार यांनी आपले पहिले लग्न लपवून महिलेशी दुसरे लग्न केल्याचे आणि त्यानंतर शारीरिक संबंध प्रस्थापित केल्याचे महिलेचे म्हणणे होते. पुढे दोघांमधील संबंध बिघडल्यानंतर महिलेने त्यांच्याविरोधात बलात्काराची फिर्याद दाखल केली.

या प्रकरणात केरळ उच्च न्यायालयाने आरोप रद्द करण्याची मागणी फेटाळली होती. त्यानंतर संतोष कुमार यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेत उच्च न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान दिले. सर्वोच्च न्यायालयाने प्रकरणातील परिस्थिती आणि परस्पर संमतीच्या मुद्द्यांचा विचार करून आरोपीला दिलासा दिला.

या निर्णयातून सर्वोच्च न्यायालयाने एक महत्त्वाचा मुद्दा स्पष्ट केला आहे. प्रेमसंबंध संपुष्टात येणे आणि सुरुवातीपासूनच फसवणूक किंवा बळजबरीने संमती मिळवणे या दोन वेगळ्या बाबी आहेत. त्यामुळे अशा प्रकरणांमध्ये भावनिक मतभेदांपेक्षा प्रत्यक्ष पुरावे आणि कायदेशीर निकषांच्या आधारेच गुन्ह्याचे स्वरूप निश्चित केले पाहिजे.

हार्दिक अभिनंदन व शुभेच्छा!
पत्रकार प्रतिक गंगणे यांना प्रतिष्ठेचा
'भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल हिंदू रत्न पुरस्कार' जाहीर!
पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल!



दैनिक आरंभ पर्वचे व्यवस्थापकीय संपादक तथा पुणे प्रहारचे संपादक
मा. श्री. प्रतिक राम गंगणे
यांना पत्रकारिता क्षेत्रातील योगदानाबद्दल प्रतिष्ठेचा
'भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल हिंदू रत्न पुरस्कार' जाहीर झाला आहे.
सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त व राष्ट्रीय एकात्मता दिनाचे औचित्य साधून आयोजित या पुरस्कार सोहळ्यात त्यांना सन्मानित करण्यात येणार आहे.

पुरस्कार वितरण सोहळा
दिनांक : शनिवार, ३१ ऑक्टोबर २०२६
वेळ : सायंकाळी ६ ते रात्री ९
स्थळ : संकल्प बँक्वेट हॉल, एलबीएस मार्ग, नवी पेठ, पुणे.

आयोजक : पद्मश्री डॉ. मणीभाई देसाई मानव सेवा ट्रस्ट.

पत्रकारिता क्षेत्रातील त्यांच्या कार्याचा गौरव करणारा
हा सन्मान निश्चितच अभिमानास्पद आहे.

प्रतिक गंगणे यांच्या पुढील यशस्वी वाटचालीस
मन:पूर्वक शुभेच्छा!

एकनाथ शिंदे मुख्यमंत्रीपदाच्या उंबरठ्यावर?

- विधान परिषद निवडणुकीतील महायुतीच्या पीछेहाटीनंतर राजकीय वर्तुळात नव्या नेतृत्वाची चर्चा
- शिंदेंच्या पुनरागमनाच्या मागणीमुळे भाजप-शिवसेना संबंधांची पुन्हा परीक्षा!

संपादकीय । सौ. सुरेखा मते

महाराष्ट्राच्या राजकारणात सत्तेची समीकरणे कधीच कायमस्वरूपी नसतात. कालपर्यंत एकमेकांच्या साथीने सत्तेचा गाडा हाकणारे मित्रपक्ष आज एकमेकांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करू लागले आहेत. महायुतीतील अंतर्गत मतभेद पुन्हा एकदा उघडपणे समोर आले असून, या राजकीय घडामोडींच्या केंद्रस्थानी आहेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे! विधान परिषद निवडणुकीतील निकालानंतर शिंदे यांना पुन्हा मुख्यमंत्री करण्याची मागणी त्यांच्या पक्षातून पुढे आल्याने राज्याच्या राजकारणात नव्या चर्चेला सुरुवात झाली आहे. त्यामुळे एकनाथ शिंदे खरोखरच मुख्यमंत्रीपदाच्या उंबरठ्यावर आहेत का, हा प्रश्न राजकीय वर्तुळात चर्चिला जात आहे.

विधान परिषदेच्या पाच जागांसाठी झालेल्या निवडणुकीत महाविकास आघाडीने तीन जागा जिंकल्या, तर महायुतीला दोन जागांवर समाधान मानावे लागले. या निकालानंतर भाजप आणि एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू झाले. भाजपकडून मित्रपक्षांच्या सहकार्यावर प्रश्न उपस्थित करण्यात आले, तर शिवसेनेच्या नेत्यांनीही भाजपच्या राजकीय कार्यपद्धतीवर टीका केली. पुणे, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगरमधील राजकीय घडामोडींनी या वादाला अधिक धार दिली.

या पार्श्वभूमीवर शिवसेनेचे नेते रवींद्र धंगेकर यांनी एकनाथ शिंदे यांना पुन्हा मुख्यमंत्री करण्याची मागणी केली. शिंदे मुख्यमंत्री असताना महायुतीला सत्तेत येण्यासाठी मोठा फायदा झाला होता, अशी भूमिका त्यांनी मांडली. मात्र, भाजपच्या नेत्यांनी या मागणीला तातडीने प्रत्युत्तर दिले. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत जनतेने देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाला कौल दिला असल्याचे भाजप नेत्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे मुख्यमंत्रीपदाचा मुद्दा हा केवळ एका नेत्याच्या मागणीपुरता मर्यादित राहिलेला नाही, तर महायुतीतील सत्तेच्या वाटपाचा आणि नेतृत्वाच्या प्रतिष्ठेचा प्रश्न बनला आहे.

एकनाथ शिंदे यांची राजकीय वाटचाल पाहिली, तर त्यांच्यासाठी मुख्यमंत्रीपद हे केवळ घटनात्मक पद नसून त्यांच्या राजकीय अस्तित्वाशी आणि पक्षाच्या विस्ताराशी जोडलेले आहे. शिवसेनेतून वेगळी भूमिका घेतल्यानंतर त्यांनी स्वतःची राजकीय ताकद निर्माण केली. २०२२ मध्ये मुख्यमंत्रीपदाची संधी मिळाल्यानंतर त्यांनी राज्याच्या राजकारणात स्वतंत्र नेतृत्व म्हणून आपली ओळख निर्माण केली. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीनंतर मात्र भाजपच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये त्यांना उपमुख्यमंत्रीपद स्वीकारावे लागले. हा सत्तेतील बदल त्यांच्या पक्षासाठी आणि समर्थकांसाठी राजकीयदृष्ट्या महत्त्वाचा ठरला.

दुसरीकडे, भाजपसाठी मुख्यमंत्रीपदाचा प्रश्न हा पक्षाच्या संख्याबळाशी आणि नेतृत्वाच्या राजकीय भूमिकेशी संबंधित आहे. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत भाजप सर्वाधिक जागा जिंकणारा पक्ष ठरला. त्यामुळे देवेंद्र फडणवीस यांचे नेतृत्व बदलण्याची मागणी भाजप सहज स्वीकारेल, असे म्हणता येत नाही. शिवाय, भाजपच्या नेत्यांनी शिंदे यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या मागणीला जाहीरपणे विरोध केल्याने हा विषय केवळ चर्चेतून सुटणारा नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

मात्र, या सगळ्या राजकारणात एक महत्त्वाचा मुद्दा दुर्लक्षित करता येणार नाही. महायुतीतील प्रत्येक पक्षाला आपली राजकीय ताकद वाढवायची आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका, पक्षसंघटनांचा विस्तार आणि कार्यकर्त्यांमधील विश्वास टिकवणे ही तिन्ही पक्षांसमोरील आव्हाने आहेत. अशा परिस्थितीत मुख्यमंत्रीपदाचा मुद्दा वारंवार पुढे आल्यास युतीतील समन्वयावर त्याचा परिणाम होऊ शकतो. दुसरीकडे, शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेला आपली स्वतंत्र राजकीय ओळख आणि सत्तेतील प्रभाव टिकवून ठेवायचा असेल, तर पक्षाच्या अपेक्षांना योग्य स्थान मिळणेही आवश्यक आहे.

मात्र, मुख्यमंत्रीपदाच्या या साऱ्या चर्चेत महाराष्ट्राच्या जनतेचा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे. कोण मुख्यमंत्री होणार, कोणत्या पक्षाचा प्रभाव वाढणार आणि कोणाला सत्तेत अधिक वाटा मिळणार, यापलीकडे राज्यातील शेतकरी, बेरोजगार तरुण, महिला, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांचे काय? राजकीय पक्षांनी सत्तेच्या समीकरणांपेक्षा विकासाच्या प्रश्नांना प्राधान्य देणे अपेक्षित आहे. नेतृत्वबदलाच्या चर्चेचा उपयोग जनतेच्या प्रश्नांपासून लक्ष विचलित करण्यासाठी होऊ नये.

एकनाथ शिंदे यांना पुन्हा मुख्यमंत्री करण्याची मागणी ही सध्या शिवसेनेतील काही नेत्यांची राजकीय भूमिका आहे. त्याला भाजपचा विरोधही स्पष्टपणे समोर आला आहे. त्यामुळे शिंदे मुख्यमंत्रीपदाच्या उंबरठ्यावर आहेत, असा निष्कर्ष काढणे घाईचे ठरेल. मात्र, या मागणीने महायुतीतील नेतृत्वाचा आणि सत्तेतील वाट्याचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आणला आहे, हे निश्चित.

महाराष्ट्राच्या राजकारणात मुख्यमंत्रीपदाची खुर्ची कोणाकडे राहणार, यापेक्षा त्या खुर्चीवर बसणारा नेता जनतेच्या अपेक्षांना किती न्याय देणार, हा खरा प्रश्न आहे. एकनाथ शिंदे यांच्या पुनरागमनाची चर्चा प्रत्यक्ष सत्तांतरात बदलणार की महायुतीतील दबावतंत्राचा एक भाग ठरणार, याचे उत्तर आगामी राजकीय घडामोडीच देतील. अखेर सत्ता ही पक्षांची असली, तरी सरकार हे जनतेचे असते, याचा विसर कोणत्याही सत्ताधाऱ्याला पडता कामा नये.



थोडक्यात पण महत्वाचे

राष्ट्रीय उपाध्यक्षपदी महेश शिवशरण



राजगुरूनगर (आरंभ पर्व) : अखिल भारतीय विकास माथाडी ट्रान्सपोर्ट व जनरल कामगार संघटनेच्या राष्ट्रीय उपाध्यक्षपदी येथील महेश पांडुरंग शिवशरण यांची नियुक्ती करण्यात आली. त्यांच्या नियुक्तीचे पत्र राष्ट्रीय अध्यक्ष मनिष लांजेवार यांनी दिले आहे. या निवडीमुळे कामगार वर्गात आनंदाचे वातावरण आहे.शिवशरण यांनी आजवर कामगारांचे विविध प्रश्न, त्यांच्या आरोग्याविषयीच्या समस्या, कायदेशीर हक्क आणि न्याय्य मागण्यांसाठी तळमळीने काम केले आहे. त्यांच्या याच निष्ठेची आणि संघटन कौशल्याची दखल घेऊन त्यांना राष्ट्रीय पातळीवरील हे पद देण्यात आले आहे. आपल्या निवडीबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना महेश शिवशरण म्हणाले, "संघटना प्रमुखांनी माझ्यावर दाखवलेला विश्वास मी सार्थ ठरवेन. देशातील आणि राज्यातील माथाडी व ट्रान्सपोर्ट कामगारांच्या कल्याणासाठी, त्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांना मार्गी लावण्यासाठी आणि संघटनेची ताकद देशपातळीवर अधिक मजबूत करण्यासाठी मी कटिबद्ध राहीन." या निवडीबद्दल शिवशरण यांचे विविध स्तरातून अभिनंदन होत आहे.

कॅसाग्रँडच्या घर खरेदीवर आता iPhone 18 प्रोची भेट

पुणे (आरंभ पर्व) : भारतातील आघाडीच्या रिअल इस्टेट डेव्हलपर्सपैकी एक असलेल्या कॅसाग्रँडने पुण्यातील अप्पर खराडी परिसरातील आपल्या प्रीमियम निवासी प्रकल्प 'कॅसाग्रँड कॅलेडियम'मध्ये घर खरेदी करणाऱ्या ग्राहकांसाठी सणासुदीची खास ऑफर जाहीर केली आहे. या ऑफरअंतर्गत घर खरेदी करणाऱ्या ग्राहकांना कंपनीकडून एक नवीन iPhone18 प्रो भेट म्हणून देण्यात येणार आहे. कॅसाग्रँड कॅलॅडियममध्ये आकर्षक पद्धतीने तयार केलेली घरे असून, येथे आधुनिक सोयीसुविधा उपलब्ध आहेत. तसेच, प्रमुख आयटी पार्क, शाळा आणि मनोरंजनाच्या ठिकाणांशी या प्रकल्पाची उत्तम कनेक्टिव्हिटी आहे. सणासुदीचा काळ हा कुटुंबांसाठी नवीन सुरुवात करण्यासाठी आणि स्वतःचे घर घेण्यासारखे महत्त्वाचे निर्णय घेण्यासाठी असतो. हीच सणासुदीच्या भेटवस्तू देण्याची भावना लक्षात घेऊन कॅसाग्रँडने घर खरेदीच्या या आनंदाच्या क्षणाला आणखी खास बनवण्यासाठी ग्राहकांना एक प्रीमियम जीवनशैलीची भेटवस्तू देण्याची घोषणा केली आहे. दर्जेदार बांधकाम, विचारपूर्वक डिझाइन केलेल्या घरांची रचना, नामांकित ब्रँडच्या वस्तू आणि आधुनिक जीवनशैलीसाठी आवश्यक सुविधा ही कॅसाग्रँडच्या घरांची वैशिष्ट्ये आहेत. त्यामुळे घर खरेदी करणाऱ्या ग्राहकांना त्यांच्या गुंतवणुकीचा चांगला फायदा मिळण्यासोबतच जीवनशैलीतही सुधारणा करता येते. या सणासुदीच्या ऑफरमुळे घर खरेदीदारांना त्यांच्या स्वप्नातील घर खरेदी करण्यासाठी आणखी एक खास कारण मिळणार आहे.

१ नोव्हेंबर रोजी पुण्यात सुफी-फ्युजन संगीताचा अनोखा अनुभव



पुणे (आरंभ पर्व) : बिस्मिल की मेहफीलच्या सादरीकरणासह १ नोव्हेंबर २०२६ रोजी मेफिल्ड इस्टेट येथे संगीतमय सायंकाळी पुण्यातील लाईव्ह मनोरंजनाची रंगत वाढणार आहे. झी लाईव्हचा प्रमुख लाईव्ह मनोरंजन मंच सुपरमूनकडून सादर होणारा हा शो सुफी शायरीची भावनिक खोली, मधुरमय धून आणि समकालीन लाईव्ह कॉन्सर्टच्या ऊर्जेचा सुरेख संगम घडवून आणेल. पारंपरिक सुफी प्रभाव आणि आधुनिक संगीत मांडणी यांची सांगड घालत बिस्मिल की मेहफील प्रेक्षकांना भावपूर्ण गायकी आणि प्रचंड ऊर्जा देणाऱ्या सादरीकरणाचा अनोखा अनुभव देते. बिस्मिल यांचा वैशिष्ट्यपूर्ण आवाज आणि मंचावरील प्रभावी उपस्थितीसह हा शो सुफी संगीतातील काव्य आणि भावनांना लाईव्ह कॉन्सर्टच्या स्वरूपात समोर आणतो, ज्यामुळे प्रेक्षकांनाही ओळखीच्या सुरांमध्ये सहभागी होण्याची आणि संगीताशी एकरूप होण्याची संधी मिळते. पुण्यातील शोबाबत मत व्यक्त करत झी लाईव्हचे बिझनेस हेड गॅरेथ एस्विन थॉमस म्हणाले, "पुण्याला समृद्ध सांस्कृतिक आणि मनोरंजन वारसा लाभला आहे येथील प्रेक्षक संगीत आणि लाईव्ह अनुभवांचे मनापासून कौतुक करतात. बिस्मिल की मेहफीलच्या माध्यमातून आम्ही शहरासाठी उत्साहवर्धक सायंकाळ घेऊन येत आहोत, जी सुफी संगीताची समृद्धी साजरी करण्यासोबत लाईव्ह परफॉर्मन्सची ऊर्जा आणि संवादही साधेल. संगीताच्या माध्यमातून व्यक्तींना एकत्र आणणारे अनुभव निर्माण करणे हेच सुपरमूनचे उद्दिष्ट आहे." बिस्मिल यांच्यासाठी कलाकार, कविता आणि प्रेक्षक यांच्यातील नाते या अनुभवाच्या केंद्रस्थानी आहे.

जुन्नरमध्ये बनावट विदेशी मद्याचे रॅकेट उघडकीस

- ११ लाख ५५ हजारांचा मुद्देमाल जप्त
- राज्य उत्पादन शुल्क विभागाची मोठी कारवाई
- तीन आरोपी अटकेत, बेल्हे ते अळकुटीपर्यंत अवैध मद्यसाठ्याचा पर्दाफाश



जुन्नर : महेश कदम (दै. आरंभ पर्व)

जुन्नर तालुक्यातील बेल्हे येथील बांगरवाडी परिसरात बनावट विदेशी मद्याची विक्री करण्यासाठी साठवणूक केल्याचा प्रकार राज्य उत्पादन शुल्क विभागाने उघडकीस आणला आहे. या कारवाईत बनावट विदेशी मद्य आणि देशी दारूचा मोठा साठा जप्त करण्यात आला असून, आरोपींच्या चौकशीतून अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील अळकुटी येथेही मद्यसाठा आढळून आला. या दोन्ही ठिकाणच्या कारवाईत एकूण ११ लाख ५५ हजार ३६० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून तीन जणांना अटक करण्यात आली आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या नारायणगाव पथकाला ३० ऑक्टोबर २०२६ रोजी अवैध मद्यविक्रीविरोधात गस्त घालत असताना गोपनीय बातमीदारामार्फत बेल्हे गावाच्या हद्दीतील बांगरवाडी वस्ती येथे बनावट विदेशी मद्याचा साठा असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने छापा टाकला असता प्रथमदर्शनी बनावट बुचे व लेबल लावलेल्या रॉयल स्टॅग व्हिस्कीच्या १८० मिलीच्या ९६ बाटल्या, तसेच देशी दारू जीएम संत्राच्या १८० मिलीच्या ५ हजार ४० बाटल्या असा एकूण ४ लाख २७ हजार २०० रुपये किमतीचा मद्यसाठा जप्त केला.

या प्रकरणातील आरोपींकडे केलेल्या चौकशीत अळकुटी (ता. पारनेर, जि. अहिल्यानगर) येथील मद्यसाठ्याची माहिती मिळाली. त्यानुसार तेथेही कारवाई करण्यात आली. या ठिकाणी प्रथमदर्शनी बनावट बुचे व लेबल असलेल्या रॉयल स्टॅग व्हिस्कीच्या १ हजार ३९२ बाटल्या आणि इम्पिरियल ब्लू व्हिस्कीच्या १ हजार ७२८ बाटल्या असा एकूण ७ लाख २८ हजार १६० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाईत सचिन गणपत गाडगे (वय ४०, रा. निमगाव सावा, ता. जुन्नर), ताहीर युसुफ शेख (वय ४३, सध्या रा. निमगाव सावा, ता. जुन्नर) आणि सागर रामदास बोरुडे (वय २७, रा. अळकुटी, ता. पारनेर) या तिघांना अटक करण्यात आली आहे. त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त डॉ. राजेंद्र देशमुख, सहआयुक्त प्रसाद सुर्वे, विभागीय उपआयुक्त सागर धोमकर आणि पुणे-२ चे अधीक्षक रविकिरण कोले यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली.

अधीक्षक व उपअधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, शिरूर विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक शरद जाधव, दुय्यम निरीक्षक सौरभ आवटे, समृद्धी निकम तसेच जवान गणेश वाव्हळ, निलेश केदार, दिलीप केकरे, प्रियंका झांजरे आणि वाहनचालक सुनील कोकणे यांच्या पथकाने ही कारवाई यशस्वी केली.

पुढील तपास निरीक्षक शरद जाधव करीत आहेत.

येरवडा म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकासाला गती

- सुधारित आराखड्याची प्रक्रिया प्रगतिपथावर

पुणे (दै. आरंभ पर्व)

येरवडा येथील महाराष्ट्र हाउसिंग बोर्डाच्या म्हाडा वसाहतीतील सुमारे ४० वर्षे जुन्या इमारतींच्या पुनर्विकासासाठी प्रशासकीय हालचालींना वेग आला आहे. सुमारे ७५ एकर परिसरात पसरलेल्या या वसाहतीतील ९० हून अधिक इमारतींच्या पुनर्विकासाचा प्रश्न मार्गी लागण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. सुधारित विकास आराखड्याला मंजुरी मिळविण्याची प्रक्रिया सुरू असून, समूह पुनर्विकासासाठी व्यवहार्यता अहवाल सादर करण्याची तयारी पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाकडून सुरू आहे. मात्र, संरक्षण विभागाचे निर्बंध आणि आवश्यक ना-हरकत प्रमाणपत्रे मिळविण्याचे आव्हान अद्याप कायम आहे. अशी माहिती रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाचे प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव यांनी दिली. येरवडा येथील सर्व्हे क्रमांक १९१-अ-१ आणि १९१-अ-२ मधील म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकासासंदर्भात पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे निवृत्त मुख्य अधिकारी सुनील पोमण यांच्यासह संबंधित अधिकाऱ्यांची नुकतीच बैठक झाली. या बैठकीत पुनर्विकासाच्या प्रक्रियेतील विविध टप्पे, आवश्यक परवानग्या आणि सुधारित विकास आराखड्याच्या प्रक्रियेची माहिती समोर आली आहे. इमारती जुन्या झाल्यामुळे रहिवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला असून, पुनर्विकास लवकरात लवकर व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. पुणे महानगरपालिकेने ३० ऑक्टोबर १९९९ रोजी मंजूर केलेल्या विकास आराखड्यानुसार संबंधित वसाहतीच्या अभिन्यासाला मंजुरी देण्यात आली होती. एकत्रीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR-2020) मधील तरतुदींनुसार, संबंधित भूखंडावर ३.०० चटई क्षेत्र निर्देशांक (एफएसआय) अनुज्ञेय असल्याचे मंडळाच्या पत्रात नमूद करण्यात आले आहे.



तंत्रज्ञान व संशोधन क्षेत्रात भारत आत्मनिर्भर व्हावा: प्रसन्न दातार

पुणे विद्यार्थी गृहाच्या अभियांत्रिकी महाविद्यालयात आयोजित तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचा समारोप

पुणे (दै. आरंभ पर्व)

"शाश्वत ऊर्जा ही येत्या काळाची गरज असून त्याची निर्मिती कशी वाढेल याकडे लक्ष द्यायला हवे. भारताने विविध तांत्रिक गोष्टींची आयात कमी करून देशांतर्गत संशोधन आणि नवोपक्रमांना प्रोत्साहन द्यायला हवे. तांत्रिक आत्मनिर्भरता ही सध्या देशासाठी सगळ्यात महत्त्वाची गोष्ट असून त्याकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे", असे प्रतिपादन अतिरिक्त सीमाशुल्क आयुक्त व महाविद्यालयाच्या यंत्र अभियांत्रिकी विभागाचे माजी विद्यार्थी प्रसन्न दातार यांनी व्यक्त केले. पुणे विद्यार्थी गृहाच्या अभियांत्रिकी, तंत्रज्ञान व व्यवस्थापन महाविद्यालयात आयोजित 'इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन ॲडव्हान्सेस इन इंजिनिअरिंग, टेक्नॉलॉजी अँड मॅनेजमेंट - २०२६' या तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेच्या समारोपावेळी ते बोलत होते. पुणे विद्यार्थी गृहाचे संचालक सुनील रेडेकर, प्रा. राजेंद्र कडुसकर, प्राचार्य डॉ. संदीप पाटील, परिषदेचे संयोजक डॉ. मनमोहन भूमकर व डॉ. रवींद्र एदलाबादकर, परिषदेचे आयोजक डॉ. गणेश मोरे आणि डॉ. शुभांगी गोंदाणे उपस्थित होते. तसेच या परिषदेला संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले. प्रसन्न दातार म्हणाले, संशोधनातून निर्माण होणाऱ्या नाविन्यपूर्ण संकल्पनांचे पेटंट घेणे आणि बौद्धिक संपदा हक्कांचे संरक्षण करणे आवश्यक आहे. तसेच संरक्षण क्षेत्राशी संबंधित संशोधनासाठी परिषदेमध्ये स्वतंत्र संशोधन विभाग समाविष्ट करण्याचे आवाहनही त्यांनी केले. या परिषदेसाठी संशोधन निबंध मागवण्यात आले होते, त्याला संशोधकांनी मोठा प्रतिसाद दिला. त्यातील निवडक १५६ संशोधन निबंधांचे पुस्तक प्रकाशित करण्यात आले आहे. यातील उत्कृष्ट संशोधन निबंधांपैकी सर्वोत्कृष्ट संशोधन निबंधांना यावेळी विशेष पुरस्कार जाहीर करण्यात आले. परिषदेच्या समारोप सत्रात सहभागी संशोधकांनी आपले अभिप्राय व अनुभव व्यक्त केले.

अभियांत्रिकी, तंत्रज्ञान आणि व्यवस्थापन क्षेत्रातील संशोधन, नवोपक्रम, ज्ञानाची देवाणघेवाण आणि आंतरराष्ट्रीय सहकार्याला प्रोत्साहन देणारी ही परिषद यशस्वीरीत्या झाली.

'कारोबार ९.० - सूर्यभारत जननेक्स्ट स्टार्टअप फेस्ट'चे आयोजन

- युनिकॉर्न कंपन्यांचा व्यावसायिक प्रवास, नवकल्पना आणि उद्योजकीय कौशल्यांचे विद्यार्थ्यांकडून सादरीकरण



पुणे (दै. आरंभ पर्व)

विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकतेची प्रेरणा, नावीन्यपूर्ण व्यावसायिक संकल्पनांना व्यासपीठ देण्यासह स्टार्टअप विश्वाची ओळख करून देण्याच्या उद्देशाने सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सतर्फे उद्या, शनिवारी (ता. ३१) 'कारोबार ९.० - सूर्यभारत जननेक्स्ट स्टार्टअप फेस्ट'चे आयोजन करण्यात आले आहे. बावधन येथील 'सूर्यदत्त'च्या कॅम्पसमध्ये सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत हा महोत्सव होणार आहे, अशी माहिती 'सूर्यदत्त'चे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांनी पत्रकार परिषदेत दिली. प्रसंगी उपाध्यक्षा व सचिव सुषमा चोरडिया, मुख्य कार्यकारी अधिकारी अक्षित कुशल, अधिष्ठाता प्रा. डॉ. प्रतीक्षा वाबळे, सूर्यदत्त कॉलेज ऑफ हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंट अँड ट्रॅव्हल टुरिझमच्या विभागप्रमुख रसिका गुमास्ते आदी उपस्थित होते. प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया म्हणाले, "या आंतरमहाविद्यालयीन व्यावसायिक प्रदर्शनात विविध महाविद्यालयांतील विद्यार्थी भारतीय युनिकॉर्न कंपन्यांचा यशस्वी प्रवास, त्यांची व्यवसाय प्रारूपे, नावीन्यपूर्ण संकल्पना, विपणन धोरणे, गुंतवणुकीचा प्रवास आणि व्यवसाय विस्ताराच्या रणनीती सादर करणार आहेत. विविध आकर्षक स्टॉल्स, व्यावसायिक प्रात्यक्षिके आणि 'स्टॉल टू सेल' या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना व्यवसायातील संकल्पना प्रत्यक्षात उतरविण्याची संधी मिळणार आहे. व्यवस्थापन आणि उद्योजकतेचे शिक्षण केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष व्यावसायिक जगाचा अनुभव मिळावा, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. उत्पादनाचे सादरीकरण, विपणन, विक्री, ग्राहकांशी संवाद आणि व्यवसाय व्यवस्थापन या विविध बाबींचा अनुभव विद्यार्थ्यांना या प्रदर्शनातून घेता येणार आहे. त्याचबरोबर व्यावसायिक निर्णयक्षमता, नेतृत्वगुण, सर्जनशीलता आणि संघभावना विकसित करण्यावर भर देण्यात येणार आहे."

युनिकॉर्न कंपन्यांच्या यशस्वी वाटचालीचा अभ्यास करताना स्टार्टअप उभारणीसाठी आवश्यक असलेले नियोजन, भांडवल उभारणी, बाजारपेठेची निवड आणि व्यवसायविस्तार यांविषयी विद्यार्थ्यांना समजून घेता येणार आहे. नव्या व्यावसायिक संकल्पना प्रत्यक्षात आणताना येणारी आव्हाने आणि उपलब्ध संधी यांचीही ओळख या माध्यमातून होणार आहे. 'विकसित भारत @ २०४७' या राष्ट्रीय संकल्पनेशी सुसंगत असलेला हा महोत्सव युवकांमध्ये उद्योजकता, नवोन्मेष, कौशल्यविकास आणि रोजगारनिर्मितीची मानसिकता विकसित करण्यास प्रोत्साहन देणार आहे. शिक्षण, उद्योग, संशोधन आणि उद्योजकता यांची सांगड घालण्याच्या सूर्यभारत ग्रुप ऑफ इंडस्ट्रीजच्या व्यापक दृष्टिकोनाशीही हा उपक्रम सुसंगत आहे, असे डॉ. प्रतीक्षा वाबळे यांनी नमूद केले.

विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला वाव देण्याबरोबरच त्यांच्यातील उद्योजकीय क्षमता विकसित करणे आणि भविष्यातील व्यावसायिक आव्हानांना सामोरे जाण्यासाठी त्यांना तयार करणे, हा या महोत्सवामागील महत्त्वाचा हेतू आहे. या प्रदर्शनाला विद्यार्थी, पालक, उद्योजक, व्यावसायिक आणि नागरिकांनी भेट देऊन विद्यार्थ्यांच्या नावीन्यपूर्ण संकल्पना व उद्योजकीय कौशल्यांचा अनुभव घ्यावा, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
शनिवार, दि. ३१ ऑक्टोबर २०२६
३



थोडक्यात पण महत्वाचे



खडकीत रेणू हॉस्पिटलच्या आरोग्य तपासणी शिबिरास मोठा प्रतिसाद

खडकी (आरंभ पर्व) : निरोगी जीवनासाठी एक पाऊल पुढे टाकून आपली खरी संपत्ती हि आपले शरीर आहे, त्याची काळजी घेणे आपल्या हातात आहे, हि गरज ओळखून गोरगरिबांची सेवा करण्यातच खरा आनंद मिळतो हे जाणून स्वताहा गरिबीचे चटके सोसले आहेत. आमच्या आईने भिक्षा मागून आम्हला डॉक्टर बनविले. तिच्या त्यागातून आमच्या कुटुंबातील तब्ब्ल ६ डॉक्टर घडले, म्हणून सामाजिक बांधिलकी जपून गोरगरिबांची सेवा करण्यासाठी अहिल्याबाई ढोबळे आईच्या स्मरणार्थ हे मोफत आरोग्य शिबीर भरवून एक आदरांजली वाहिली, अशा शब्दात पुण्यातील प्रसिध्द डॉ. विजय ढोबळे यांनी आपले मत व्यक्त केले. खडकी येथे रेणू हॉस्पिटल बोपोडीच्या वतीने मोफत आरोग्य शिबिराचे उदघाट्न प्रसिध्द उद्योजक मा. कृष्णकुमार गोयल यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी संचेती हॉस्पिटल पुणे आर्थोपेडिक डॉ. अजय कोठारी, माजी सैनिक जुबेर शेख, विजय हिंगणेश्वर, सामाजिक कार्यकर्ते नूर अहमद पिरजादे, गौस शेख, विनोद रणपिसे, रेश्मा कांबळे, मयूरी गायकवाड, मुस्कान शेख, विलास ढोबळे, सुरेश ससाणे, सिद्दिक पठाण, विनोद सोनावणे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. या शिबिरात प्रामुख्याने रक्त तपासणी एक्सरे, ईसीजी, सोनोग्राफी, डोळ्यांची तपासणी करण्यात आली. शिबिराचा २०५ रुग्णाची लाभ घेतला या शिबिराला संचेती हॉस्पिटलच्या डॉ. टीमचे विशेष सहकार्य लाभले. शिबिराच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दत्ता सूर्यवंशी आणि आभार आयोजक डॉ. विजय ढोबळे यांनी मांडले.



रंगीबेरंगी आकाश कंदिलांची रेलचेल

- दिवाळीच्या स्वागतासाठी बाजारपेठ सज्ज

तळेगाव दाभाडे (आरंभ पर्व) : दिवाळीच्या पार्श्वभूमीवर तळेगाव दाभाडे शहरातील बाजारपेठेत विविध रंगांचे आणि आकर्षक डिझाइनचे आकाश कंदील विक्रीसाठी दाखल झाले आहेत. दुकानांसमोर मांडलेले रंगीबेरंगी कंदील नागरिकांचे लक्ष वेधून घेत असून, दिवाळीच्या सजावटीसाठी बाजारपेठेत विविध पर्याय उपलब्ध झाले आहेत. पारंपरिक कंदिलांसह आधुनिक डिझाइनचे, विविध आकारांचे आणि आकर्षक नक्षीकाम असलेले कंदील बाजारपेठेत पाहायला मिळत आहेत. कागद, कापड तसेच विविध सजावटीच्या साहित्यापासून तयार केलेल्या कंदिलांमध्ये रंग आणि आकारांची विविधता दिसून येत आहे. घराच्या सजावटीशी सुसंगत कंदील निवडण्याकडे नागरिकांचा कल असतो. दिवाळीत घरासमोर आकाश कंदील लावण्याची परंपरा असल्याने या सणाच्या सजावटीत त्याला विशेष महत्त्व आहे. आकाश कंदिलाच्या प्रकाशाने घराच्या प्रवेशद्वाराला आकर्षक रूप येते. त्यामुळे दिवाळीच्या तयारीत आकाश कंदील खरेदीलाही महत्त्वाचे स्थान असते. दिवाळीच्या खरेदीसाठी बाजारपेठेत नागरिकांची वर्दळ वाढू लागली असून, सणाचे दिवस जवळ येत असताना आकाश कंदिलांच्या विक्रीत आणखी वाढ होईल, अशी अपेक्षा व्यापाऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे.

वळसे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबीर संपन्न



आंबेगाव (आरंभ पर्व) : दत्तात्रयनगर, पारगाव तर्फे अवसरी बु, (ता. आंबेगाव) येथील भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक - संचालक व महाराष्ट्र राज्याचे गृहमंत्री मा.आ.श्री. दिलीपराव वळसे पाटील यांच्या ७० व्या वाढदिवसानिमित्त कारखान्याचे चेअरमन बाळासाहेब बेंडे व व्हाईस चेअरमन प्रदीप वळसे पाटील यांचे मार्गदर्शनाखाली कारखाना कार्यस्थळावर भीमाशंकर सहकारी साखर कारखाना व भीमाशंकर शिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने शिवनेरी ब्लड सेंटर, मंचर यांचेमार्फत रक्तदान शिबीर संपन्न झाल्याची माहिती कारखान्याचे कार्यकारी संचालक चंद्रकांत ढगे यांनी दिली. रक्तदान शिबीराचे उदघाटन कारखान्याचे संचालक बाबासाहेब खालकर यांचे हस्ते संपन्न झाले. यावेळी कारखान्याचे संचालक अशोक घुले, रामचंद्र ढोबळे, दादाभाऊ पोखरकर, शांताराम हिंगे, आनंदराव शिंदे, मच्छिंद्र गावडे, बाजीराव बारवे, ज्ञानेश्वर अस्वारे, पोपटराव थिटे, पुष्पलता जाधव, प्रिया बाणखेले, कार्यकारी संचालक चंद्रकांत ढगे, सेक्रेटरी रामनाथ हिंगे, कामगार कल्याण अधिकारी सुरेश शिंदे, पर्चेस अधिकारी ब्रिजेश लोहोट, स्टोअर किपर अनिल बोंबले, सिव्हिल इंजीनिअर अमीर पठाण, सुरक्षा अधिकारी कैलास गाढवे, भीमाशंकर शिक्षण संस्थेचे ओ.एस.डी. बी.डी. चव्हाण, कार्यालयीन अधिक्षक वसंत जाधव, दत्तात्रय गोविंदराव वळसे पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य नाथा मोकाटे व शिक्षकवृंद, सेवक वर्ग उपस्थित होते. तसेच शिवनेरी ब्लड सेंटरचे संचालक चंद्रभान वाघ, डॉ. वर्षा शेळके व त्यांचे सहकारी यांनी रक्तदान शिबीर यशस्वी होण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. रक्तदान शिबिराला कारखान्यातील अधिकारी, कर्मचारी व शिक्षण संस्थेतील शिक्षकवृंद व सेवक वर्ग यांनी उस्फुर्तपणे प्रतिसाद दिला. रक्तदान शिबीरामध्ये २०५ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

'एनएसटी पुणे'चा इंटर्नशिप प्लेसमेंट दर ९८.३ टक्क्यांवर

पुणे (आरंभ पर्व) : न्यूटन स्कूल ऑफ टेक्नॉलॉजीने (एनएसटी) २०२८च्या बॅचमधील पात्र विद्यार्थ्यांचा इंटर्नशिप प्लेसमेंट दर ९८.३ टक्के नोंदवला आहे. विशेष म्हणजे, विद्यार्थ्यांना मिळालेल्या इंटर्नशिपपैकी जवळपास एक तृतीयांश संधी एआय आणि डेटा क्षेत्रातील कंपन्यांमध्ये मिळाल्या आहेत. एनएसटीच्या इंटर्नशिप रिपोर्ट २०२६मध्ये ही माहिती प्रसिद्ध करण्यात आली आहे. अजिंक्य डी. वाय. पाटील विद्यापीठात संगणकशास्त्र आणि कृत्रिम बुद्धिमत्ता विषयांचा अभ्यास करणाऱ्या ३१३ विद्यार्थ्यांच्या बॅचचा हा अहवाल आहे. या विद्यार्थ्यांना १७३ कंपन्यांमध्ये इंटर्नशिपच्या संधी मिळाल्या. यापूर्वी एनएसटीच्या एनसीआर केंद्रातील १०४ विद्यार्थ्यांचा प्लेसमेंट दर ९३.०७ टक्के नोंदवण्यात आला होता. पुणे केंद्रातील मोठ्या बॅचनेही चांगली कामगिरी केली आहे. या अहवालाची स्वतंत्र पडताळणी चार्टर्ड अकाउंटंट्स सोराब एस. इंजिनीअर अँड कंपनी यांनी केली आहे.

दौंडमध्ये अवैध धंद्यांचा सुळसुळाट

राष्ट्रवादी काँग्रेसचा पोलिसांना कारवाईचा इशारा : मटका, जुगार, गांजा, गावठी दारू, चक्री आणि कॅसिनो बंद करण्याची मागणी

- कारवाई न झाल्यास पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर आंदोलन छेडणार

दौंड (दै. आरंभ पर्व)

दौंड शहरासह दौंड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ग्रामीण भागात अवैध धंद्यांनी पुन्हा डोके वर काढल्याचा आरोप करत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने पोलीस प्रशासनाविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. मटका, जुगार अड्डे, गांजा विक्री, गावठी दारू, चक्री आणि कॅसिनोसारखे अवैध व्यवसाय तातडीने बंद करून संबंधित अड्डाचालकांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी दौंड शहर व तालुका राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने पोलिसांना निवेदन देऊन करण्यात आली आहे. या धंद्यांवर कारवाई न झाल्यास पुणे जिल्हा ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही पक्षाने दिला आहे. दौंड पोलीस ठाण्याच्या वतीने विविध अवैध धंद्यांवर कारवाई केली जात असल्याचे दिसून येते. मात्र, काही ठिकाणी वरिष्ठ अधिकाऱ्यांना अंधारात ठेवून अवैध धंद्यांना कोणाचे अभय मिळत आहे, याचा शोध वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी घ्यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. दौंड शहर आणि ग्रामीण परिसरात भरचौकात दिवसा उघडपणे मटका, दारू, चक्री आणि जुगाराचे अड्डे सुरू असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसने केला आहे. या अवैध धंद्यांमुळे तरुण पिढी व्यसनाधीनतेकडे वळत असून, अनेक जण कर्जबाजारी होत आहेत. परिणामी अनेक कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त होत असून, आत्महत्यांसारख्या गंभीर घटना घडण्याची भीती निर्माण झाली आहे. या व्यवसायांमुळे शहरातील कायदा व सुव्यवस्थेचाही प्रश्न निर्माण होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. दौंड पोलीस ठाण्याच्या हद्दीत खून, घरफोड्या, दरोडे, खासगी सावकारी आणि महिलांच्या गळ्यातील सोनसाखळी चोरीच्या घटना वारंवार घडत असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. त्यामुळे नागरिक आणि महिलांमध्ये असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. फरार आरोपी पोलीस ठाण्याच्या परिसरात खुलेआम फिरत असल्याचा दावा करत पोलिसांच्या कार्यपद्धतीवरही प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत.

कायद्याचे राज्य टिकवणे, नागरिकांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देणे आणि तरुण पिढीला व्यसनाधीनता व गुन्हेगारीपासून दूर ठेवणे ही पोलिसांची महत्त्वाची जबाबदारी आहे. त्यामुळे या निवेदनाकडे केवळ औपचारिक तक्रार म्हणून न पाहता सार्वजनिक हिताच्या दृष्टीने गांभीर्याने लक्ष द्यावे, असेही पक्षाने स्पष्ट केले आहे. या वेळी पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे, माजी आमदार रमेश थोरात, नगराध्यक्ष दुर्गादेवी जगदाळे, पुणे जिल्हा परिषद सदस्य साहेबराव पोळ, भीमा पाटसचे माजी संचालक महेश अण्णा भागवत, दौंड नगरपालिकेचे गटनेते जीवराज पवार, नगरसेवक मंगेश चलवादी, पंचायत समिती सदस्य बाळासाहेब निवगुणे, शहराध्यक्ष गुरुमुख नारंग, युवक अध्यक्ष निखिल स्वामी यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. आता राष्ट्रवादी काँग्रेसच्या या निवेदनानंतर दौंडमधील कथित अवैध धंद्यांविरोधात पोलीस प्रशासन कोणती ठोस पावले उचलते आणि संबंधितांवर प्रत्यक्ष कारवाई होते का, याकडे दौंडकरांचे लक्ष लागले आहे.



अवैध धंद्यांविरोधातील कारवाई करताना कोणत्याही राजकीय पक्षाचा पदाधिकारी किंवा कार्यकर्ता असल्यामुळे संबंधितांना अभय मिळता कामा नये. कोणत्याही राजकीय दबावाला बळी न पडता निष्पक्षपणे कारवाई करून सर्व अवैध धंदे बंद करावेत, अशी ठाम भूमिका राष्ट्रवादी काँग्रेसने मांडली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रमुख मागण्या

- निवेदनातून पोलिसांकडे पुढील मागण्या करण्यात आल्या आहेत.
- मटका, पत्त्यांचे जुगार अड्डे, सट्टेबाजी, चक्री आणि कॅसिनोवर तातडीने छापे टाकून चालक व संबंधित जागामालकांवर गुन्हे दाखल करावेत.
- गांजा, अमली पदार्थ, अवैध दारू आणि गुटखा विक्रीविरोधात कठोर कारवाई करावी.
- अवैध वेश्या व्यवसाय आणि मानवी तस्करीशी संबंधित बेकायदेशीर कृत्यांना आळा घालावा.
- परवानाधारक दारू दुकाने रात्री उशिरापर्यंत सुरू राहत असल्यास संबंधित दुकानमालकांवर कारवाई करावी.
- बेकायदेशीर सावकारी करून नागरिकांचे आर्थिक शोषण करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करावेत.
- महिला व विद्यार्थिनींची छेडछाड करणाऱ्या रोडरोमिओ आणि गावगुंडांवर कठोर कारवाई करावी.
- चोरी व घरफोड्यांच्या घटना रोखण्यासाठी रात्रीची पोलीस गस्त वाढवावी.
- अष्टविनायक मार्गावरील नगरमोरी चौक ते भीमनगर या मुख्य रस्त्यावरील अवजड वाहतूक बंद करून ती शहराबाहेरील मार्गाने वळवावी.

डी. बी. जगत्पुरिया यांना पुरस्कार जाहीर

बाली (इंडोनेशिया)(दै. आरंभ पर्व)

विख्यात कवी, साहित्य समीक्षक आणि ज्येष्ठ पत्रकार डी. बी. जगत्पुरिया यांना जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळ, नागपूर यांच्या वतीने प्रदान करण्यात येणारा प्रतिष्ठेचा 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय प्रज्ञा पुरस्कार' जाहीर झाला आहे. इंडोनेशियातील बाली येथे १९ आणि २० नोव्हेंबर रोजी आयोजित जागतिक साहित्य संमेलनात त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे, या संमेलनासाठी त्यांना मुख्य अतिथी म्हणूनही निमंत्रित करण्यात आले आहे. या दुहेरी सन्मानामुळे साहित्य आणि पत्रकारिता क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. डी. बी. जगत्पुरिया यांनी मराठी साहित्य, कविता, समीक्षा आणि सामाजिक वैचारिक लेखनाच्या क्षेत्रात मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या नावावर मराठी व हिंदी कवितासंग्रहांसह पाच समीक्षा ग्रंथ, सामाजिक-वैचारिक पुस्तके, व्यक्तिचित्रे, नाटके आणि एकांकिका अशा विविध साहित्यप्रकारांतील सुमारे ३० ते ३२ पुस्तके प्रकाशित झाली आहेत.



त्यांच्या साहित्यिक कार्याची दखल घेत त्यांना यापूर्वी ३५ व्या अस्मितादर्श साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद, अंकुर साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद तसेच अन्य अनेक साहित्य संमेलनांचे अध्यक्षपद भूषविण्याचा मान मिळाला आहे.

भारतीय घोडदौड क्षेत्राचे तारणहार सर झवारय पूनावाला

'लेजेंड ऑफ इंडियन हॉर्स रेसिंग' पुरस्काराने सन्मानित!

पुणे (दै. आरंभ पर्व)

भारतीय घोडदौड क्षेत्राच्या विकासासाठी आणि अस्तित्व टिकवण्यासाठी सातत्याने योगदान देणारे ज्येष्ठ उद्योगपती तथा घोडदौड क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्तिमत्त्व सर झवारय एस. पूनावाला यांना 'लेजेंड ऑफ इंडियन हॉर्स रेसिंग' या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. २४ ऑक्टोबर २०२६ रोजी म्हैसूर येथे टर्फ अथॉरिटीज ऑफ इंडिया (TAI) यांच्या वतीने आयोजित रेसिंग एक्सलन्स पुरस्कार सोहळ्यात त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला. त्यांच्या प्रदीर्घ योगदानाची आणि भारतीय घोडदौड क्षेत्राच्या विकासासाठी केलेल्या कार्याची ही विशेष दखल मानली जात आहे. भारतीय घोडदौड क्षेत्रासमोर आर्थिक संकट उभे राहिले असताना सर झवारय पूनावाला यांनी मदतीचा हात पुढे केला. बंगळुरू आणि म्हैसूर येथील रेस क्लबच्या अडचणीच्या काळात त्यांनी आर्थिक पाठबळ देत या क्षेत्रातील जॉकी, प्रशिक्षक, घोड्यांची देखभाल करणारे कर्मचारी आणि संबंधित घटकांच्या रोजगाराला आधार देण्याचे काम केले. बंगळुरू टर्फ क्लबच्या विकासासाठी तसेच कुनिगल येथे नवीन रेसकोर्स उभारण्याच्या प्रयत्नांत त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. म्हैसूर रेस क्लबच्या माध्यमातूनही त्यांनी विविध स्पर्धांना प्रायोजकत्व देत घोडदौड क्षेत्राला प्रोत्साहन दिले. 'झवारय पूनावाला म्हैसूर डर्बी', 'झवारय पूनावाला बंगळुरू डर्बी', १००० व २००० गिनीज, सेंट लेजर आणि इंडियन टर्फ इन्व्हिटेशन कप यांसारख्या प्रतिष्ठित स्पर्धांशी त्यांचे नाव जोडले गेले आहे. २०२६ मधील म्हैसूर येथील इंडियन टर्फ इन्व्हिटेशन कप स्पर्धेलाही त्यांचे प्रायोजकत्व लाभले. भारतीय घोडदौड क्षेत्रातील कोणताही रेस क्लब आर्थिक अडचणींमुळे बंद पडू नये, ही त्यांची भूमिका असल्याचे सांगितले जाते.



भारतीय घोडदौड क्षेत्राकडून मानाचा मुजरा!

२४ ऑक्टोबर रोजी मिळालेला 'लेजेंड ऑफ इंडियन हॉर्स रेसिंग' पुरस्कार हा केवळ एका व्यक्तीचा सन्मान नसून भारतीय घोडदौड क्षेत्रासाठी केलेल्या दीर्घकालीन योगदानाची पावती आहे. याच पुरस्कार सोहळ्यात पूनावाला कुटुंबाच्या घोडदौड क्षेत्रातील योगदानाचीही दखल घेण्यात आली. ज्या वयात अनेक जण निवृत्तीचा विचार करतात, त्या वयातही भारतीय घोडदौड क्षेत्राच्या भवितव्याचा विचार करून त्याच्या विकासासाठी प्रयत्नशील असलेले सर झवारय पूनावाला यांचे कार्य निश्चितच उल्लेखनीय आहे.

संदीप-प्रदीप मते पाटील बंधूंची राष्ट्रीय स्तरावर भरारी

सिमेंट विक्री व्यवसायात भरारी; 'ऑल इंडिया टॉपर'चा बहुमान!

- अल्ट्राटेक सिमेंटचा 'चॅम्पियन ऑफ चॅम्पियन्स – २०२६' पुरस्कार प्राप्त
- खडकवासल्याच्या शिरपेचात मानाचा तुरा

खडकवासला (दै. आरंभ पर्व)

जिद्द, मेहनत, सचोटी आणि व्यावसायिक प्रामाणिकतेच्या जोरावर खडकवासला गावातील संदीप पाटीलबुवा मते पाटील आणि त्यांचे बंधू प्रदीप पाटीलबुवा मते पाटील यांनी सिमेंट विक्री व्यवसायात राष्ट्रीय स्तरावर यश संपादन केले आहे. अल्ट्राटेक सिमेंट कंपनीच्या वतीने देण्यात येणारा प्रतिष्ठेचा 'चॅम्पियन ऑफ चॅम्पियन्स – २०२६' हा पुरस्कार मिळवत त्यांनी 'ऑल इंडिया टॉपर'चा बहुमान पटकावला आहे. त्यांच्या या यशामुळे खडकवासला गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.



खडकवासला येथील एका सामान्य शेतकरी कुटुंबातून पुढे आलेल्या मते पाटील बंधूंनी आपल्या कष्टाच्या आणि जिद्दीच्या बळावर व्यवसाय क्षेत्रात स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. 'मुकाई सिमेंट एजन्सी'च्या माध्यमातून त्यांनी सिमेंट विक्री व्यवसायात उल्लेखनीय कामगिरी केली. ग्राहकांचा विश्वास, दर्जेदार सेवा, व्यावसायिक नियोजन आणि सातत्यपूर्ण मेहनत या गुणांच्या जोरावर त्यांनी राष्ट्रीय स्तरावर आपली छाप उमटवली आहे.

व्यवसायात यश मिळवण्यासाठी केवळ आर्थिक भांडवल पुरेसे नसते, तर ग्राहकांशी विश्वासाचे नाते निर्माण करणे, बाजारपेठेतील बदल समजून घेणे आणि प्रत्येक परिस्थितीत प्रामाणिकपणे काम करणे आवश्यक असते. मते पाटील बंधूंनी याच तत्त्वांचा अवलंब करत आपला व्यवसाय यशस्वीपणे विस्तारला. त्यांच्या या कामगिरीची दखल घेत अल्ट्राटेक सिमेंट कंपनीने त्यांना राष्ट्रीय स्तरावरील हा बहुमान प्रदान केला आहे.

संदीप मते पाटील यांची ओळख केवळ यशस्वी उद्योजक म्हणून नाही, तर सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात कार्यरत असलेले नेतृत्व म्हणूनही आहे. खडकवासला गावचे माजी उपसरपंच तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शरदचंद्र पवार गटाचे खडकवासला विधानसभा प्रमुख म्हणून ते कार्यरत आहेत. व्यावसायिक जबाबदाऱ्या सांभाळतानाच सामाजिक आणि सार्वजनिक जीवनातही त्यांचा सहभाग असतो.

सामान्य शेतकरी कुटुंबातून सुरू झालेला प्रवास ते राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कारापर्यंतची झेप हा मते पाटील बंधूंचा प्रवास निश्चितच तरुण उद्योजकांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या यशामागे कुटुंबीयांचा पाठिंबा, सहकाऱ्यांचे सहकार्य आणि ग्राहकांनी दाखवलेला विश्वासही महत्त्वाचा ठरला आहे.

संदीप मते पाटील आणि प्रदीप मते पाटील यांनी मिळवलेला हा बहुमान म्हणजे त्यांच्या वर्षानुवर्षांच्या मेहनतीची आणि व्यावसायिक निष्ठेची पावती आहे. त्यांच्या या यशाबद्दल खडकवासला परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, पुढील व्यावसायिक वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या जात आहेत.



मैदान देता का हो मैदान...?

लोहगावच्या खेळाडूंचा टाहो; आठ वर्षांपासून आरक्षित जागेवर क्रीडांगणाची प्रतीक्षाच!

- आंतरराष्ट्रीय दर्जाचे विमानतळ असलेल्या लोहगावमध्ये मात्र खेळाडूंना साधे मैदानही नाही!
- दोन ते तीन एकर जागा आरक्षित असूनही क्रीडांगण उभारणी रखडली
- क्रिकेट, व्हॉलीबॉल, टेबल टेनिस खेळणाऱ्या तरुणांचे भविष्य अंधारात

पुणे : निरंजन (सोमनाथ) साळुंके (दै. आरंभ पर्व)

"मैदान देता का हो मैदान...? कोणी मैदान देता का...?" असा आर्त सवाल आज लोहगाव परिसरातील खेळाडू आणि क्रीडाप्रेमी तरुणांकडून उपस्थित केला जात आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाचे विमानतळ, शैक्षणिक संस्थांचे जाळे, झपाट्याने वाढणारी लोकसंख्या आणि नागरीकरणाचा वेग अशा अनेक वैशिष्ट्यांनी ओळखल्या जाणाऱ्या लोहगावमध्ये मात्र खेळाडूंना सरावासाठी हक्काचे मैदान उपलब्ध नाही. विशेष म्हणजे, क्रीडांगण आणि उद्यानासाठी दोन ते तीन एकर जागा आरक्षित असल्याचे सांगितले जात असतानाही गेल्या आठ वर्षांत प्रत्यक्ष मैदान उभारण्याच्या दिशेने ठोस पावले पडलेली नाहीत. त्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाचे नाव उज्ज्वल करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या नवोदित खेळाडूंवर मैदानाअभावी 'नटसम्राट' होण्याची वेळ आली आहे.

एकीकडे राज्यभरात क्रीडा संस्कृती वाढविण्यासाठी शासनाकडून विविध योजना, क्रीडा स्पर्धा आणि खेळाडूंना प्रोत्साहन देण्याच्या घोषणा केल्या जात आहेत. दुसरीकडे पुण्यासारख्या विद्येच्या माहेरघरात आणि आंतरराष्ट्रीय विमानतळ असलेल्या लोहगावमध्ये मुलांना खेळण्यासाठी साधे मैदानही मिळू नये, ही बाब प्रशासनाच्या विकासाच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे.

महापालिकेत समावेश झाला; मात्र विकासाचे स्वप्न कागदावरच!

'पुणे तेथे काय उणे' अशी ओळख असलेल्या पुणे शहराचा विस्तार गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणात झाला आहे. रोजगार, शिक्षण आणि व्यवसायाच्या संधींच्या शोधात राज्याच्या विविध भागांसह परराज्यांतील नागरिकांनी पुण्याकडे धाव घेतली. परिणामी शहराबरोबरच उपनगरांची लोकसंख्याही झपाट्याने वाढली.

दैनिक आरंभपर्व EXCLUSIVE

"येरवड्यासारख्या भागात कोट्यवधी रुपये खर्च करून उभारण्यात आलेल्या क्रीडा संकुलाचा लाभ आर्थिकदृष्ट्या सक्षम कुटुंबांतील खेळाडूंनाच अधिक मिळत असेल आणि गरीब कुटुंबांतील युवक शुल्क परवडत नसल्याने त्यापासून दूर राहत असतील, तर सार्वजनिक निधीतून उभारलेल्या या सुविधांचा सर्वसामान्यांना काय उपयोग? क्रीडा सुविधा सर्वांसाठी परवडणाऱ्या असणे गरजेचे आहे."

पूर्व हवेली परिसरातील येरवडा, धानोरी, विश्रांतवाडी आणि इतर भागांप्रमाणेच जगद्गुरू संत तुकाराम महाराजांचे आजोळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लोहगावचा समावेशही सुमारे आठ वर्षांपूर्वी पुणे महानगरपालिकेत करण्यात आला. महापालिकेत समावेश झाल्यानंतर रस्ते, ड्रेनेज व्यवस्था, पथदिवे, पाणीपुरवठा, उद्याने आणि क्रीडांगणे यांसारख्या मूलभूत सुविधा उपलब्ध होतील, अशी अपेक्षा स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली होती. मात्र, आजही परिसरातील अनेक नागरी समस्या कायम असल्याची नागरिकांची तक्रार आहे. त्यात आता क्रीडांगणाचा प्रश्न गंभीर बनला आहे. महापालिकेत समावेश होऊन आठ वर्षे उलटली, तरी खेळाडूंना हक्काचे मैदान मिळत नसेल, तर महापालिकेच्या विकासकामांचा लाभ नेमका कोणाला मिळत आहे, असा सवाल उपस्थित होत आहे.

लोहगाव परिसरात खासगी शाळा, महाविद्यालये आणि विविध शैक्षणिक संस्था मोठ्या प्रमाणावर आहेत. देशाच्या विविध भागांतून तसेच परदेशातून विद्यार्थी येथे शिक्षणासाठी येतात. शिक्षणाबरोबरच क्रीडा क्षेत्रातही नाव कमावण्याची स्वप्ने अनेक विद्यार्थी पाहतात. क्रिकेट, व्हॉलीबॉल, टेबल टेनिस यांसह विविध खेळांमध्ये प्रावीण्य मिळविण्याची क्षमता असलेले अनेक तरुण या परिसरात आहेत.

मात्र, या खेळाडूंना नियमित सरावासाठी आवश्यक असलेली मैदाने, क्रीडा सुविधा आणि योग्य वातावरणच उपलब्ध नसल्याने त्यांच्या प्रतिभेला संधी मिळत नाही. मैदान नसल्यामुळे काहींना खासगी क्रीडा केंद्रांचा आधार घ्यावा लागतो, तर काहींना शहरातील दूरच्या क्रीडांगणांवर जावे लागते.

सर्वसामान्य आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील खेळाडूंना खासगी क्रीडा केंद्रांचे शुल्क परवडत नसल्याने त्यांची खेळाडू होण्याची स्वप्ने सुरुवातीलाच खुंटत आहेत. प्रतिभा असूनही केवळ आर्थिक परिस्थिती आणि मैदानाच्या अभावामुळे अनेक युवा खेळाडू क्रीडा क्षेत्रापासून दूर जात आहेत. ही केवळ एका मैदानाची समस्या नसून भविष्यातील खेळाडूंच्या संधींचा प्रश्न आहे. या संपूर्ण प्रश्नातील सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे ग्रामपंचायतीच्या कार्यकाळात स्थानिक नागरिकांसाठी उद्यान आणि खेळाडूंसाठी क्रीडांगण उभारण्याच्या उद्देशाने अंदाजे दोन ते तीन एकर जागा आरक्षित करण्यात आल्याचे सांगितले जाते. मात्र, महापालिकेत समावेश झाल्यानंतरही या जागेवर प्रत्यक्ष क्रीडांगण उभारण्याचे काम मार्गी लागलेले नाही.

गेल्या आठ वर्षांपासून आरक्षित जागेचा प्रश्न प्रलंबित राहिल्याने स्थानिक खेळाडू आणि नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे. या जागेचा विकास का झाला नाही? क्रीडांगणासाठी निधी उपलब्ध झाला आहे का? प्रस्ताव तयार झाला आहे का? प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे का? काम सुरू करण्यास नेमक्या कोणत्या अडचणी आहेत? या प्रश्नांची उत्तरे महापालिका प्रशासनाने द्यावीत, अशी मागणी होत आहे.

विशेष म्हणजे, परिसरातील आरक्षित जागेच्या संरक्षणाची जबाबदारी प्रशासनाची असताना या जागेवर अतिक्रमण किंवा अन्य प्रकारे जागेचा वापर होण्याची शक्यता आहे का, याबाबतही नागरिकांमध्ये चर्चा सुरू आहे. त्यामुळे महापालिकेने या जागेची प्रत्यक्ष पाहणी करून तिचे सीमांकन करावे आणि क्रीडांगण उभारणीचा कालबद्ध आराखडा जाहीर करावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

लोहगावची ओळख आज केवळ उपनगरापुरती मर्यादित राहिलेली नाही. येथे आंतरराष्ट्रीय विमानतळ आहे. देश-विदेशातील प्रवाशांची ये-जा असते. शैक्षणिक संस्था आणि निवासी संकुले वाढत आहेत. मात्र, या परिसरातील स्थानिक मुलांना खेळण्यासाठी मैदान मिळत नसेल, तर विकासाच्या या चित्रातील विरोधाभास अधोरेखित होतो.

एका बाजूला मोठमोठे गृहप्रकल्प, व्यावसायिक इमारती आणि नागरी सुविधा विस्तारत आहेत; तर दुसऱ्या बाजूला मुलांच्या शारीरिक आणि मानसिक विकासासाठी आवश्यक असलेल्या मैदानाचा प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित आहे. मुलांना मोबाईल आणि इंटरनेटच्या जगातून बाहेर काढून खेळाच्या मैदानाकडे वळविण्याची गरज व्यक्त होत असताना प्रत्यक्ष मैदानच उपलब्ध नसेल, तर क्रीडा संस्कृती कशी विकसित होणार?

मैदान हे केवळ क्रिकेट किंवा फुटबॉल खेळण्याचे ठिकाण नसते. ते मुलांच्या आरोग्याचे, शिस्तीचे, संघभावनेचे आणि नेतृत्वगुणांचे प्रशिक्षण केंद्र असते. उद्याचे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय खेळाडू अशाच स्थानिक मैदानांमधून घडत असतात. त्यामुळे लोहगावला क्रीडांगण उपलब्ध करून देणे ही केवळ विकासकामाची मागणी नसून पुढील पिढीच्या भवितव्याशी संबंधित बाब आहे.

लोहगावकरांचा सवाल एकच?

"आठ वर्षांपूर्वी जागा आरक्षित केली, आठ वर्षे उलटली; मग मैदान उभारण्यासाठी आणखी किती वर्षे वाट पाहायची? खेळाडूंना मैदान मिळणार कधी? प्रशासनाने आता तरी जागे व्हावे; कारण मैदानाअभावी खेळाडूंच्या स्वप्नांचा खेळ होऊ देऊ नका!"

क्रीडा संकुलाची अवस्था पाहून प्रश्न अधिक गंभीर!

लोहगावमधील क्रीडांगणाचा प्रश्न उपस्थित होत असतानाच येरवडा परिसरातील कोट्यवधी रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या क्रीडा संकुलाच्या सुविधांबाबतही प्रश्न उपस्थित केले जात आहेत. या क्रीडा संकुलात विविध खेळांच्या सुविधा उपलब्ध असल्या, तरी त्याचा लाभ सर्वसामान्य आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांतील खेळाडूंना कितपत मिळतो, याबाबत नाराजी व्यक्त होत आहे. खासगी शुल्क आणि इतर खर्च परवडत नसल्याने गरीब कुटुंबांतील अनेक युवकांना या सुविधांचा लाभ घेता येत नाही. त्यामुळे सार्वजनिक निधीतून उभारण्यात येणारी क्रीडा संकुले सर्व स्तरांतील खेळाडूंसाठी खुली आणि परवडणारी असावीत, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. कोट्यवधी रुपये खर्च करून क्रीडा संकुले उभारली जात असतील, तर त्याचा लाभ केवळ आर्थिकदृष्ट्या सक्षम खेळाडूंनाच मिळणार का? सर्वसामान्य घरातील मुलांना क्रीडा क्षेत्रात संधी मिळवून देण्यासाठी प्रशासनाने कोणती व्यवस्था केली आहे? असे सवालही उपस्थित होत आहेत.

राजकारण बाजूला ठेवा; मैदान उभारा!

खेळाडूंच्या भविष्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी, महापालिकेचा क्रीडा विभाग आणि प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. केवळ आश्वासने आणि कागदोपत्री प्रस्तावांवर हा प्रश्न सोडविता येणार नाही. आरक्षित जागेचा ताबा, तिचे संरक्षण, निधीची तरतूद, विकास आराखडा आणि प्रत्यक्ष कामाची सुरुवात याबाबत प्रशासनाने स्पष्ट भूमिका जाहीर करावी. लोहगावमध्ये क्रिकेट, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, कबड्डी, खो-खो, धावणे आणि इतर खेळांसाठी आवश्यक सुविधा असलेले सुसज्ज क्रीडांगण उभारण्यात यावे. त्याचबरोबर सर्वसामान्य कुटुंबांतील मुलांना परवडणाऱ्या दरात किंवा आवश्यकतेनुसार मोफत प्रशिक्षणाची व्यवस्था करण्यात यावी. महिलांसाठी आणि मुलींसाठीही सुरक्षित क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात. राजकीय श्रेयवाद बाजूला ठेवून स्थानिक लोकप्रतिनिधींनी एकत्रितपणे या कामासाठी पुढाकार घेण्याची वेळ आली आहे. अन्यथा मैदानाअभावी खेळाडूंची स्वप्ने केवळ स्वप्नेच राहतील आणि उद्याचे संभाव्य राष्ट्रीय खेळाडू आजच क्रीडा क्षेत्रापासून दूर जातील.

मावळच्या पाणीटंचाईवर आतापासूनच उपाययोजना

जुलै २०२७ पर्यंत पाणीसाठा आरक्षित! पवना, इंद्रायणी आणि आंद्रा नदीवरील नादुरुस्त बंधाऱ्यांची दोन महिन्यांत दुरुस्ती होणार; कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत महत्त्वपूर्ण निर्णय

तळेगाव दाभाडे (दै. आरंभ पर्व)

मावळ तालुक्यात आगामी काळात संभाव्य पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनाने आतापासूनच पाणी व्यवस्थापनाचे नियोजन सुरू केले आहे. तालुक्यातील नागरिकांना पिण्यासाठी पुरेसे पाणी उपलब्ध होण्याबरोबरच शेतकऱ्यांच्या शेती सिंचनाची गरजही पूर्ण व्हावी, यासाठी जुलै २०२७ पर्यंत आवश्यक उपयुक्त पाणीसाठा आरक्षित करण्याबाबत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. तसेच पवना, इंद्रायणी आणि आंद्रा नदीवरील नादुरुस्त कोल्हापुरी पद्धतीच्या बंधाऱ्यांची दुरुस्ती पुढील दोन महिन्यांत पूर्ण करण्याचे आश्वासन जलसंपदा विभागाने दिले आहे. आमदार सुनील शेळके यांनी ही माहिती दिली. पुण्यातील विधानभवन येथे कालवा सल्लागार समितीची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. उपमुख्यमंत्री



तथा पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार आणि जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला मावळचे आमदार सुनील शेळके उपस्थित होते. या बैठकीत मावळ तालुक्यातील पाणीपुरवठा, शेती सिंचन, धरणांमधील उपलब्ध पाणीसाठा आणि भविष्यातील संभाव्य पाणीटंचाई यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. मावळ तालुक्यातील अनेक गावांची पिण्याच्या पाण्याची तसेच शेती सिंचनाची गरज पवना, इंद्रायणी आणि आंद्रा नदीच्या जलस्रोतांवर अवलंबून आहे. मात्र, या नद्यांवरील काही कोल्हापुरी पद्धतीचे बंधारे नादुरुस्त असल्यामुळे उपलब्ध पाण्याचा अपेक्षित उपयोग करण्यात अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे नदीकाठच्या गावांमध्ये पाणीसाठा टिकवून ठेवण्यासाठी या बंधाऱ्यांची दुरुस्ती तातडीने करण्याची मागणी आमदार सुनील शेळके यांनी बैठकीत केली. या मागणीची दखल घेत जलसंपदा विभागाकडून पुढील दोन महिन्यांत संबंधित बंधाऱ्यांच्या दुरुस्तीची कामे पूर्ण करण्याचे आश्वासन देण्यात आले. बंधाऱ्यांची दुरुस्ती झाल्यानंतर नदीपात्रातील पाणी अडवून त्याचा स्थानिक पातळीवर उपयोग करणे अधिक सुलभ होणार आहे. यामुळे नदीकाठच्या गावांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा आणि शेती सिंचनासाठी आवश्यक पाणी उपलब्ध करून देण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. बैठकीतील सर्वांत महत्त्वाचा निर्णय म्हणजे मावळ तालुक्यातील गावांसाठी जुलै २०२७ पर्यंत पिण्याच्या पाण्यासह शेती सिंचनासाठी आवश्यक उपयुक्त पाणीसाठा आरक्षित करण्याबाबत करण्यात आलेले नियोजन. संभाव्य पाणीटंचाईचा विचार करून धरणांमधील उपलब्ध जलसाठ्याचे योग्य व्यवस्थापन करणे आणि आवश्यकतेनुसार पाणी उपलब्ध करून देणे, यावर बैठकीत भर देण्यात आला.

मोटारीत आढळला कुजलेला मृतदेह

पुणे (दै. आरंभ पर्व)

सारसबागेजवळील नेहरू स्टेडियमबाहेर उभ्या असलेल्या एका मोटारीत शुक्रवारी (ता. ३०) तरुणाचा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत आढळून आला. संबंधित तरुण चार दिवसांपासून बेपत्ता होता. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली असून, तरुणाच्या मृत्यूमागचे गूढ उकलण्यासाठी स्वारगेट पोलिसांनी तपास सुरू केला आहे. शुभ्रत बाळासाहेब बनसोडे (वय २५, रा. कवडीपाट, लोणी काळभोर) असे मृत तरुणाचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नेहरू स्टेडियमबाहेरील रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या एका मोटारीतून दुर्गंधी येत असल्याने स्थानिक नागरिकांच्या ही बाब निदर्शनास आली. मोटारीत तरुणाचा मृतदेह दिसताच नागरिकांनी पोलिसांना कळविले. माहिती मिळताच स्वारगेट पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. मृतदेह कुजलेल्या अवस्थेत असल्याने सुरुवातीला ओळख पटवणे कठीण झाले होते.

तळेगावचा नवा रंगमंच बालगंधर्व रंगमंदिराची आठवण करून देणारा - पं. सुरेश साखवळकर

तळेगाव दाभाडे (दै. आरंभ पर्व)

तळेगाव दाभाडे येथे नव्याने उभारण्यात आलेला सुसज्ज रंगमंच सांस्कृतिक चळवळीला नवी दिशा देणारा ठरेल. या रंगमंचाची रचना आणि दर्जा बालगंधर्व रंगमंदिराची आठवण करून देणारा असून, अशा दर्जेदार रंगमंचाचा तळेगावकरांना सार्थ अभिमान वाटावा, असे प्रतिपादन पं. सुरेश साखवळकर यांनी केले.



अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, तळेगाव दाभाडे-मावळ शाखा आणि सेवाधाम ट्रस्ट ग्रंथालय व मोफत वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने उभारण्यात आलेल्या रंगमंचाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी आयोजित वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. तसेच संपदा थिटे व सहकलाकारांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाला उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्यांमध्ये इयत्ता चौथी ते सातवी गटात श्रेया हिंगडे हिने प्रथम, ओवी वीर हिने द्वितीय, तर निलेश भिलारे, आरुष डोलारे आणि ईश्वरी यांनी विभागून तृतीय क्रमांक मिळविला. समीक्षा अडसूळ व अतुल्य नागरगोजे यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले.


इयत्ता आठवी ते दहावी गटात तनिष्का गोरडे हिने प्रथम, स्वरांजली मराठे हिने द्वितीय, तर वैष्णवी पाटील आणि गार्गी दडस यांनी विभागून तृतीय क्रमांक पटकावला. वेदांग जोशी आणि जयेश वाघमारे यांना उत्तेजनार्थ पारितोषिक प्रदान करण्यात आले.

कार्यक्रमाला माजी नगराध्यक्ष संतोष हरि दाभाडे, माजी उपनगराध्यक्ष तथा नाट्य परिषदेचे कार्याध्यक्ष गणेश काकडे, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखेचे अध्यक्ष सुरेश धोत्रे, डॉ. अनंत परांजपे, कलापिनीच्या अध्यक्षा, माजी नगराध्यक्ष उमाकांत कुलकर्णी, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे पुणे जिल्हा प्रमुख प्रभाकर ओव्हाळ, वक्तृत्व स्पर्धेचे परीक्षक तथा महाराष्ट्र साहित्य परिषद, तळेगाव शाखेचे अध्यक्ष श्रीकृष्ण पुरंदरे आदी उपस्थित होते.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.

थोडक्यात पण महत्वाचे



अनंत आशानगरमध्ये घाणीचे साम्राज्य; नागरिकांचे आरोग्य धोक्यात

बारामती (आरंभ पर्व) : अनंत आशानगरमध्ये ठिकठिकाणी साचलेले कचऱ्याचे ढिगारे, उघडी गटारे आणि परिसरात पसरलेली दुर्गंधी यामुळे नागरिक अक्षरशः त्रस्त झाले आहेत. कचरा वेळेवर उचलला जात नसल्याने तसेच गटारांची नियमित स्वच्छता होत नसल्याने परिसरात अस्वच्छतेचे चित्र निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे घरांच्या पाठीमागील खिडक्या उघड्या असल्याने कचरा व उघड्या गटारांमधून येणारी दुर्गंधी थेट घरांमध्ये शिरत असल्याने रहिवाशांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. या दुर्गंधीमुळे लहान मुले, ज्येष्ठ नागरिक तसेच सर्वसामान्यांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे. परिसरात डास, माशा व रोगराई वाढण्याची शक्यता असताना प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष का? कचऱ्याची नियमित उचल आणि गटारांची स्वच्छता करण्याची जबाबदारी कोणाची? नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित हा गंभीर प्रश्न प्रशासन कधी गांभीर्याने घेणार? असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. प्रशासनाने तातडीने अनंत आशानगर परिसराची पाहणी करून साचलेला कचरा हटवावा, उघड्या गटारांची स्वच्छता करावी आणि भविष्यात अशी परिस्थिती निर्माण होणार नाही यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. बारामती नगरपरिषदेचे आरोग्य निरीक्षक यशराज बनसोडे यांच्याशी या प्रकरणासंदर्भात संपर्क साधून प्रतिक्रिया जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता, त्यांनी प्रतिक्रिया देण्यास टाळाटाळ केली. त्यामुळे संबंधित प्रकरणावर नगरपरिषद प्रशासनाची अधिकृत भूमिका अद्याप स्पष्ट झालेली नाही.



उन्नती कन्या विद्यालयात आजी-आजोबा दिवस उत्साहात साजरा

उरुळी कांचन (आरंभ पर्व) : आजी-आजोबांच्या सहवासातून आणि अनुभवातून जीवनमूल्ये, संस्कृती, परंपरा, कष्ट, माणुसकी आणि नात्यांची जपणूक शिकता यावी म्हणून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. उन्नती कन्या विद्यालय हे केवळ मुलींसाठी असलेले इंग्रजी माध्यमाचे (संलग्नता क्र. 1131458) पंचक्रोशीतील प्रसिद्ध विद्यालय आहे. शाळेच्या अध्यक्षा नयॉन सुरेश कांचन, संचालिका डॉ.नुपूर सुरेश कांचन आणि मुख्याध्यापिका पद्मादेवी विडप यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. आजच्या छोट्या मुली उद्याच्या सजग, सुजाण नागरिक बनून संस्कारित समाजाची निर्मिती करतील, या दृष्टिकोनातून शाळा नेहमीच विविध उपक्रमांचे आयोजन करत असतात. आजी-आजोबा दिनानिमित्त विद्यार्थिनींनी सर्वप्रथम आपल्या आजी-आजोबांचे स्वागत केले. त्यानंतर त्यांचे औक्षण करुन कार्यक्रमाची मंगलमय सुरुवात केली. विद्यार्थिनींनी सादर केलेल्या स्वागतपर नृत्याने उपस्थितांची मने जिंकली. त्यानंतर विद्यार्थिनींनी सादर केलेल्या नाटिकेतून आजी-आजोबांचे आपल्या जीवनातील अनमोल स्थान, त्यांच्याविषयीचा आदर, प्रेम आणि जिव्हाळा यांचे सुंदर दर्शन घडविले. आजी-आजोबांनी केलेले संस्कार, दिलेले प्रेम आणि त्यांच्या मार्गदर्शनातून घडलेले आपले व्यक्तिमत्त्व याविषयी विद्यार्थिनींनी मनोगते व्यक्त केली. तसेच सुंदर कवितांच्या सादरीकरणातून आजी-आजोबांविषयीच्या प्रेम, आदर आणि कृतज्ञतेच्या भावना व्यक्त केल्या. आजी-आजोबांसाठी आयोजित करण्यात आलेल्या संगीत खुर्ची व विविध मनोरंजक खेळांमुळे कार्यक्रमात आनंदाची रंगत अधिकच वाढली. या खेळांमध्ये आजी-आजोबांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. या संपूर्ण कार्यक्रमातून दोन पिढ्यांमधील प्रेम, जिव्हाळा, आपुलकी आणि स्नेहबंध यांचे सुंदर दर्शन घडले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पल्लवी काटदरे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक वृंदांनी मोलाचे सहकार्य केले.

जागतिक सोरायसिस दिनानिमित्त सोरियाट्रीट चा पुढाकार



पुणे (आरंभ पर्व) : जागतिक सोरायसिस दिनानिमित्त सोरियाट्रीट तर्फे गुरुवारी मोफत ऑनलाइन जनजागृती वेबिनारचे आयोजन करण्यात आले. या वेबिनारमध्ये सोरायसिसच्या केवळ त्वचेवर दिसणाऱ्या लक्षणांवरच नव्हे, तर या आजाराचा रुग्णांच्या भावनिक आरोग्यावर आणि सामाजिक जीवनावर होणाऱ्या परिणामांवरही चर्चा करण्यात आली. 'Understanding Psoriasis. Understanding You.' अर्थात 'सोरायसिस समजून घ्या, रुग्णालाही समजून घ्या' हा या उपक्रमाचा मुख्य संदेश होता.या वेबिनारमध्ये सुमारे चार दशकांचा अनुभव असलेले होमिओपॅथिक सोरायसिस तज्ज्ञ डॉ. आर. एस. सोनवणे आणि डॉ. सोनल सहभागी झाले. डॉ. सोनवणे यांच्या ध्वनिचित्रमुद्रित मार्गदर्शनासह डॉ. सोनल यांनी थेट संवाद साधत सहभागींच्या प्रश्नांना उत्तरे दिली. सोरायसिसविषयीचे गैरसमज दूर करणे, योग्य माहितीचा प्रसार करणे आणि या आजाराने ग्रस्त असलेल्या व्यक्तींकडे अधिक संवेदनशीलतेने पाहण्याची गरज अधोरेखित करणे हा या वेबिनारचा उद्देश होता. हा उपक्रम सोरियाट्रीट च्या जागतिक सोरायसिस सप्ताह २०२६ अंतर्गत राबविण्यात आलेल्या 'Look Beyond My Skin' या जनजागृती मोहिमेचा भाग होता.

भाजी विक्रेत्यांना हटविल्यास काँग्रेस रस्त्यावर उतरणार

- अंबर परदेशी यांचा नगरपालिकेला इशारा
- भाजी मंडईतील जागेच्या कमतरतेचा मुद्दाही उपस्थित



जुन्नर (दै. आरंभ पर्व)

जुन्नर शहरातील शंकरपुरा पेठेतून बसस्थानकाकडे जाणाऱ्या अंतर्गत रस्त्यावर भाजी विक्री करणाऱ्या विक्रेत्यांना हटविण्यासाठी नगरपालिकेने तारीख दिल्याने हा प्रश्न चर्चेत आला आहे. गरीब भाजी विक्रेत्यांच्या उपजीविकेचा विचार न करता त्यांना हटविण्याची कारवाई केल्यास काँग्रेस पक्षाच्या वतीने सर्व भाजी विक्रेत्यांना सोबत घेऊन आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा जुन्नर तालुका काँग्रेसचे अध्यक्ष अंबर परदेशी यांनी दिला आहे. जुन्नर शहरातील अनेक गरीब महिला भाजी विक्रीचा व्यवसाय करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. हा व्यवसायच त्यांच्या कुटुंबाच्या उपजीविकेचे साधन असल्याने त्यांना वारंवार हटविण्याचा प्रयत्न करणे अन्यायकारक असल्याचे मत अंबर परदेशी यांनी व्यक्त केले. नगरपालिका भाजी विक्रेत्यांना जाणीवपूर्वक त्रास देत असल्याचा आरोपही त्यांनी केला. जुन्नर नगरपालिकेच्या वतीने शहरात भाजी विक्रेत्यांसाठी मोठे शेड उभारण्यात आले आहे. मात्र, या मंडईतील स्टॉलसाठी उपलब्ध असलेली जागा अत्यंत कमी आहे. तेथे भाजीच्या चार पाट्यादेखील व्यवस्थित ठेवता येत नाहीत, अशी अडचण भाजी विक्रेत्यांना येत असल्याचे अंबर परदेशी यांनी सांगितले. मंडईत पुरेशी जागा उपलब्ध नसताना रस्त्यावरील भाजी विक्रेत्यांना हटविण्याची कारवाई करण्यापूर्वी त्यांच्या व्यवसायासाठी योग्य पर्यायी व्यवस्था करणे आवश्यक आहे. गरीब विक्रेत्यांच्या रोजीरोटीचा प्रश्न लक्षात घेऊन नगरपालिकेने निर्णय घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली. दिवाळीच्या काळात याच अंतर्गत रस्त्यावर फटाक्यांचे स्टॉल उभारले जातात. फटाक्यांचे स्टॉल शहराबाहेर असावेत, अशी अपेक्षा असताना शहराच्या मध्यवर्ती भागात त्यांना परवानगी कशी दिली जाते, असा सवाल अंबर परदेशी यांनी उपस्थित केला.

एका बाजूला दिवाळीत फटाक्यांच्या स्टॉलना जागा उपलब्ध करून दिली जाते, तर दुसऱ्या बाजूला कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी भाजी विक्री करणाऱ्या गरीब महिला व विक्रेत्यांना हटविण्याची भूमिका घेतली जाते, ही बाब योग्य नसल्याचे त्यांनी सांगितले. शंकरपुरा पेठेतून बसस्थानकाकडे जाणाऱ्या अंतर्गत रस्त्यावर बसणाऱ्या भाजी विक्रेत्यांमुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत नसल्याचा दावाही अंबर परदेशी आणि भाजी विक्रेत्यांनी केला आहे.

कारवाई झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा

भाजी विक्रेत्यांच्या उपजीविकेचा प्रश्न गांभीर्याने घेऊन नगरपालिकेने त्यांना हटविण्याचा निर्णय मागे घ्यावा. तसेच, विक्रेत्यांना पुरेशी जागा उपलब्ध करून देण्याबाबत सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी मागणी अंबर परदेशी यांनी केली आहे. नगरपालिकेने भाजी विक्रेत्यांना हटविण्याची कारवाई केल्यास काँग्रेस पक्षाच्या वतीने सर्व भाजी विक्रेत्यांना सोबत घेऊन आंदोलन सुरू करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा अंबर परदेशी यांनी दिला आहे. आता भाजी विक्रेत्यांच्या उपजीविकेचा प्रश्न आणि मंडईतील जागेची कमतरता लक्षात घेऊन जुन्नर नगरपालिका काय भूमिका घेते, याकडे शहरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

हिरो मोटोकॉर्पकडून निओ-रेट्रो स्टायलिंगसह डेस्टिनी ११० क्लासिक एडिशन लाँच

पुणे (दै. आरंभ पर्व)

हिरो मोटोकॉर्प या जगातील मोटरसायकल आणि स्कूटर्सच्या सर्वात मोठ्या उत्पादक कंपनीने आज आपल्या लोकप्रिय फॅमिली स्कूटरला नवीन आणि वैशिष्ट्यपूर्ण लूक देत डेस्टिनी ११० क्लासिक एडिशन लाँच केली. सणासुदीच्या हंगामाचे औचित्य साधून लाँच करण्यात आलेली ही नवीन स्पेशल एडिशन आकर्षक ड्युअल-टोन रंगसंगती, वैशिष्ट्यपूर्ण स्ट्राइप डिटेलिंग आणि खास ३डी क्लासिक एडिशन एम्बलमसह डेस्टिनी ११० ची प्रतिष्ठा अधिक उंचावते. दैनंदिन उपयुक्ततेमध्ये सणासुदीच्या उत्साहाची भर घालत ही नवीन एडिशन डेस्टिनी ११० च्या पोर्टफोलिओमध्ये स्टायलिश आणि नवीन पर्याय जोडते. सप्टेंबर २०२५ मध्ये लाँच झालेली डेस्टिनी ११० आरामदायीपणा, सोईस्करता आणि इंधन कार्यक्षमतेवर भर देत भारतातील कुटुंबांच्या दैनंदिन प्रवासाच्या गरजा पूर्ण करते. क्लासिक एडिशन या प्रस्थापित वैशिष्ट्यांना पुढे नेत अद्वितीय निओ-रेट्रो डिझाइनसह सध्याच्या श्रेणीमध्ये नवीन आकर्षक पर्यायाची भर करते. या लाँचबाबत मत व्यक्त करत हिरो मोटोकॉर्पच्या इंडिया बिझनेस युनिटचे चीफ बिझनेस ऑफिसर आशुतोष वर्मा म्हणाले, "डेस्टिनी ११० फॅमिली स्कूटर ग्राहकांच्या दैनंदिन गरजा लक्षात घेऊन डिझाइन करण्यात आली आहे, ज्यामध्ये आरामदायीपणा, सोईस्करता आणि इंधन कार्यक्षमता केंद्रस्थानी आहेत. ग्राहकांच्या पसंतीतील बदल लक्षात घेता क्लासिक एडिशनने आपल्या उपयुक्त वैशिष्ट्यांना कायम ठेवत नवीन ड्युअल-टोन रंग आणि वैशिष्ट्यपूर्ण डिझाइनच्या माध्यमातून डेस्टिनी ११० च्या पोर्टफोलिओमध्ये नवीन लूक आणला आहे.

पत्नीनेच पतीच्या हत्येचा कट रचल्याचा आरोप

१५ लाखांची सुपारी

पुणे (दै. आरंभ पर्व)

प्रेमविवाहानंतर तब्बल २० वर्षांनी मालमत्तेच्या वादातून पत्नीनेच पतीच्या हत्येचा कट रचल्याचा धक्कादायक प्रकार पुण्यात उघडकीस आला आहे. पतीसह त्याच्या मैत्रिणीचीही हत्या करण्यासाठी १५ लाख रुपयांची सुपारी दिल्याचा आरोप पत्नीवर करण्यात आला आहे. यातील साडेबारा लाख रुपये नात्यातील एका तरुणाला टप्प्याटप्प्याने दिल्याचा दावा फिर्यादीने केला आहे. या प्रकरणी आंबेगाव पोलीसांनी पत्नीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, ४९ वर्षीय फिर्यादीने आई-वडिलांचा विरोध पत्करून २००६ मध्ये नात्यातील तरुणीशी प्रेमविवाह केला होता. या दाम्पत्याला एक मुलगाही आहे. मात्र, कालांतराने मालमत्तेच्या कारणावरून दोघांमध्ये वाद निर्माण झाले. दरम्यान, २०२३ मध्ये पतीचा त्याच्या महाविद्यालयीन मैत्रिणीशी पुन्हा संपर्क आला. घरातील सततच्या वादांना कंटाळून पती आईकडे राहण्यासाठी गेला होता. त्यानंतर पत्नीने पतीच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी खासगी गुप्तहेरांची मदत घेतल्याचाही आरोप आहे.

या प्रकरणाला २० सप्टेंबर २०२६ रोजी धक्कादायक वळण मिळाले. फिर्यादीच्या चुलत बहिणीच्या मुलाने त्यांची भेट घेऊन कथित हत्येच्या कटाची माहिती दिली. त्याच्या म्हणण्यानुसार, मामी, तिची आई आणि मामा यांनी त्याला भेटून फिर्यादी व त्यांच्या मैत्रिणीची हत्या करण्यासाठी १५ लाख रुपयांची सुपारी देऊ केली होती. भाच्याने दिलेल्या माहितीनुसार, मार्च २०२६ पासून त्याला टप्प्याटप्प्याने १२ लाख ५० हजार रुपये देण्यात आले होते. यापूर्वीही काही व्यक्तींना हत्येची सुपारी देण्यात आली होती; मात्र त्यांनी हे काम पूर्ण केले नसल्याने आपल्याला या कटात सहभागी करण्यात आल्याचा दावा त्याने केला.

मोबाईल रेकॉर्डिंगमुळे प्रकरणाला गंभीर वळण

भाच्याने मामीसोबत झालेल्या कथित संभाषणाचे मोबाईल रेकॉर्डिंग फिर्यादीला ऐकविल्याचे सांगण्यात येते. हा प्रकार समजल्यानंतर फिर्यादीने नातेवाईकांना माहिती दिली आणि पोलिसांत धाव घेतली. या तक्रारीच्या आधारे आंबेगाव पोलिसांनी पत्नीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. सहायक पोलीस निरीक्षक स्वाती देवधर या प्रकरणाचा पुढील तपास करीत आहेत. मालमत्तेच्या वादातून हत्येचा कट रचण्यात आला का, कथितरीत्या पैसे कोणाकडून आणि कोणाला देण्यात आले, तसेच या प्रकरणात आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास पोलीस करीत आहेत. सुपारी दिल्याचे आणि पैसे हस्तांतरित झाल्याचे आरोप अद्याप तपासातून सिद्ध होणे बाकी आहे.

बारामती प्रशासकीय कार्यालयालाच लागलाय टाळा

- बारामतीकरांमध्ये संतापची लाट
- नागरिकांना पूर्वसूचना देण्याची मागणी



बारामती (दै. आरंभ पर्व)

बारामती शहरातील प्रशासकीय भवन परिसरात नागरिकांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असताना येथील तलाठी कार्यालय बंद असल्याने विविध कामांसाठी येणाऱ्या नागरिकांची मोठी गैरसोय होत असल्याचे चित्र समोर आले आहे. महसूल विभागाशी संबंधित विविध कामांसाठी नागरिक तलाठी कार्यालयात येत असतात. मात्र कार्यालय बंद असल्याने नागरिकांना रिकाम्या हाताने परतावे लागत असून, काही नागरिकांना कामासाठी पुन्हा हेलपाटे मारावे लागत आहेत. विशेष म्हणजे कार्यालय बंद असताना कार्यालय बंद असण्याचे कारण, तलाठी उपलब्ध होण्याची वेळ किंवा पर्यायी संपर्काची माहिती देणारा कोणत्याही स्वरूपाचा सूचना फलकही कार्यालयाबाहेर लावण्यात आलेला नसल्याचे दिसून येत आहे. शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या प्रशासकीय भवनात नागरिकांची सतत वर्दळ असते. त्यामुळे संबंधित कार्यालय बंद ठेवण्यात येत असेल तर नागरिकांना त्याची पूर्वकल्पना देणे तसेच कार्यालयाबाहेर स्पष्ट सूचना फलक लावणे आवश्यक आहे.

नागरिकांना विनाकारण हेलपाटे मारावे लागू नयेत, यासाठी तलाठी कार्यालय नियमितपणे सुरू ठेवावे, कार्यालयीन वेळ स्पष्टपणे दर्शविणारा सूचना फलक लावावा आणि कार्यालय बंद असल्यास त्याचे कारण व पर्यायी संपर्क क्रमांक नागरिकांना उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

दरम्यान, या प्रकाराबाबत संबंधित महसूल प्रशासनाने तातडीने दखल घेऊन नागरिकांची होणारी गैरसोय दूर करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. तलाठी यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता संपर्क होऊ शकला नाही.

नशामुक्त समाजासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज

पुणे (दै. आरंभ पर्व)

पुणे आणि महाराष्ट्राला नशामुक्त करण्यासाठी युनायटेड मायनॉरिटी कौन्सिलने (युएमसी) हाती घेतलेल्या उपक्रमाचे कौतुक करताना पंजाबचे शाही इमाम मौलाना मोहम्मद उस्मान रहमानी लुधियानवी म्हणाले की, नशामुक्त समाज घडवण्यासाठी कुटुंब, धार्मिक संस्था आणि समाजातील सर्व घटकांनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे. उपस्थितांना मार्गदर्शन करताना मौलाना रहमानी म्हणाले की, व्यसनाधीनतेचा परिणाम केवळ संबंधित व्यक्तीच्या आरोग्यावर आणि भविष्यावर होत नाही, तर त्याचे संपूर्ण कुटुंबही त्याचे दुष्परिणाम भोगते. त्यामुळे व्यसनाधीन व्यक्तींना समाजापासून दूर लोटण्याऐवजी त्यांना योग्य मार्गदर्शन केले पाहिजे. नशा-मुक्तिसाठी समाजात जनजागृती करण्याबरोबरच गरजू व्यक्तींसाठी उपचार आणि पुनर्वसनाची व्यवस्थाही उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

ते म्हणाले, "व्यसनाचा तिरस्कार करा, व्यसन करणाऱ्या माणसाचा नाही. व्यसनाच्या आहारी गेलेल्या व्यक्तींना प्रेम, आपुलकी आणि योग्य मार्गदर्शनाची गरज असते. समाजातील जबाबदार व्यक्ती, ज्येष्ठ नागरिक आणि कुटुंबीयांनी एकत्र येऊन ही सामाजिक समस्या दूर करण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे."



मोटोटेक २०२६ पुणेचे उद्घाटन संपन्न

उद्योग सहकार्य आणि इलेक्ट्रिक वाहनांसाठीच्या सज्जतेवर भर

पुणे (दै. आरंभ पर्व)

वाहननिर्मिती क्षेत्रासाठी ओईएम अपडेट तर्फे आयोजित विशेष परिषद आणि प्रदर्शन मोटोटेक २०२६ पुणेच्या सातव्या आवृत्तीचे आज उद्घाटन झाले. पीसीएमसी चे आयुक्त व प्रशासक आणि ऑटो क्लस्टर डेव्हलपमेंट अँड रिसर्च इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष डॉ. विजय सूर्यवंशी, आयएएस, यांच्या हस्ते महाराष्ट्र ईव्ही सेलचे राज्य प्रमुख जितेंद्र पाटील आणि इतर मान्यवर उद्योग प्रतिनिधींच्या उपस्थितीत कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. ३०-३१ ऑक्टोबर २०२६ रोजी ऑटो क्लस्टर एक्झिबिशन सेंटर, चिंचवड, पुणे येथे आयोजित हा दोन दिवसीय कार्यक्रम वाहन उत्पादक, तंत्रज्ञान पुरवठादार, वाहन सुटे भाग पुरवठादार, एमएसएमई आणि उद्योग क्षेत्रातील व्यावसायिकांना एकत्र आणत आहे. यंदाची संकल्पना आहे—"पुढील पिढीच्या मोबिलिटीसाठी भविष्यकालीन कारखाना." दीपप्रज्वलनानंतर डॉ. सूर्यवंशी यांनी कार्यक्रम सुरू झाल्याची घोषणा केली. पुणे आणि पिंपरी-चिंचवड हे देशातील आघाडीच्या वाहननिर्मिती केंद्रांपैकी एक असल्याचे सांगत, तंत्रज्ञानाची देवाणघेवाण आणि औद्योगिक विकासासाठी विविध घटकांना एकत्र आणण्यात मोटोटेक बजावत असलेल्या भूमिकेचे त्यांनी कौतुक केले. डॉ. सूर्यवंशी यांनी उत्पादक, स्टार्टअप आणि एमएसएमई यांना ऑटो क्लस्टरमधील उत्पादन आरेखन आणि प्रोटोटाइप निर्मिती सुविधांचा अधिकाधिक वापर करण्याचे आवाहन केले. विशेषतः स्वतःच्या आस्थापनांमध्ये अशा सुविधा नसलेल्या उद्योगांनी त्यांचा लाभ घ्यावा, असे त्यांनी सांगितले.

अतिरिक्त यंत्रसामग्री आणि पायाभूत सुविधांच्या गरजा उद्योग प्रतिनिधींनी मांडाव्यात, असे आवाहनही त्यांनी केले. यामध्ये इलेक्ट्रिक वाहननिर्मितीशी संबंधित सुविधांचाही समावेश असून, उद्योगांच्या प्रत्यक्ष गरजांनुसार भविष्यात ऑटो क्लस्टरच्या सुविधांचे आधुनिकीकरण करता येईल, असे त्यांनी नमूद केले. प्रदर्शनातील एका इलेक्ट्रिक ट्रकचा उल्लेख करताना त्यांनी व्यावसायिक वाहतुकीत परिवर्तन घडवून आणण्याची क्षमता विद्युतीकरणात असल्याचे सांगितले. युवकांना इलेक्ट्रिक वाहनांच्या दुरुस्तीचे प्रशिक्षण देण्यासाठी एसकेएफ, टाटा स्ट्राइव आणि पीसीएमसी यांच्या संयुक्त उपक्रमाचीही त्यांनी माहिती दिली. कौशल्य विकास केवळ दुचाकी आणि प्रवासी वाहनांपुरता मर्यादित न ठेवता इलेक्ट्रिक बस आणि ट्रकपर्यंत विस्तारण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पायाभूत सुविधांच्या गरजा आणि स्थानिक अडचणी सोडवण्यासाठी उद्योगांसोबत काम करण्याच्या पीसीएमसीच्या कटिबद्धतेचा डॉ. सूर्यवंशी यांनी पुनरुच्चार केला. महानगरपालिकेच्या सीएसआर पोर्टलच्या माध्यमातून सहकार्याच्या संधी शोधण्याचे आवाहनही त्यांनी कंपन्यांना केले.

औद्योगिक विकासात व्यापक सहभागाचे आवाहन करताना त्यांनी तांत्रिक प्रशिक्षण आणि उद्योजकतेमध्ये महिलांचा सहभाग वाढविण्यावर तसेच दिव्यांग व्यक्तींना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यावर भर दिला. दिव्यांग भवनमधील प्रशिक्षण आणि सहाय्यक तंत्रज्ञान सुविधांच्या विकासात उद्योगांच्या भागीदारीची भूमिकाही त्यांनी अधोरेखित केली. उद्घाटन सत्रात बोलताना महाराष्ट्र ईव्ही सेलचे राज्य प्रमुख जितेंद्र पाटील यांनी सांगितले की, पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील वाहननिर्मितीचा अनुभव, कुशल मनुष्यबळ आणि वाहन चाचणी क्षमता इलेक्ट्रिक मोबिलिटीकडे होणाऱ्या वाटचालीसाठी भक्कम पाया उपलब्ध करून देतात. वाहन उद्योगात व्यापक बदल होत असताना मोटोटेक हे ईव्ही उत्पादक आणि इतर संबंधित घटकांना अनुभवांची देवाणघेवाण करण्यासाठी, विचार मांडण्यासाठी आणि नवीन संपर्क प्रस्थापित करण्यासाठी उपयुक्त व्यासपीठ उपलब्ध करून देत असल्याचे त्यांनी सांगितले. संवाद सुलभ करणे, उद्योगांच्या अडचणी समजून घेणे आणि संबंधित विभागांमधील समन्वय वाढविण्यात ईव्ही सेलच्या भूमिकेवर पाटील यांनी भर दिला. उदयोन्मुख तंत्रज्ञान आणि उत्पादन क्षेत्राच्या नव्या गरजांसाठी तयारी करताना अनुभवी वाहन उद्योग तज्ज्ञांच्या ज्ञानाचा आणि अनुभवाचा लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

आपल्या जाहिरातींसाठी विश्वासार्ह व्यासपीठ

शासकीय, निमशासकीय, बँकिंग व सार्वजनिक जाहिरातींसाठी प्रभावी माध्यम

आपल्या संस्थेच्या सर्व प्रकारच्या अधिकृत जाहिराती आता प्रसिद्ध करा दैनिक आरंभ पर्व मध्ये –
विश्वास, पारदर्शकता आणि व्यापक वाचकवर्ग असलेले प्रभावी माध्यम.

आम्ही प्रसिद्ध करतो :

- शासकीय जाहिराती ✓
- ग्रामपंचायत जाहिराती ✓
- निविदा / टेंडर नोटीस ✓
- जाहीर नोटीस ✓
- बँकांचे ताळेबंद व लिलाव सूचना ✓
- सहकारी संस्था जाहिराती ✓
- शैक्षणिक संस्था सूचना ✓
- कोर्ट / कायदेशीर नोटीस ✓
- सार्वजनिक सूचना व प्रसिद्धीपत्रके ✓
- व्यवसायिक व व्यापारी जाहिराती ✓

का निवडाल दैनिक आरंभ पर्व?

- ग्रामीण व शहरी भागात प्रभावी पोहोच
- कमी दरात उत्तम प्रसिद्धी
- जलद व अचूक प्रकाशन सेवा
- विश्वासार्ह आणि लोकप्रिय माध्यम
- डिजिटल व प्रिंट दोन्ही प्लॅटफॉर्मवर प्रसिद्धी



आपल्या जाहिराती अधिकधिक लौकांपर्यंत पोहोचवण्यासाठी
आजच संपर्क साधा!

संपर्क :
प्रतिक गंगणे
7276314142
8657865702

ई-मेल :
aparvinfo@gmail.com

दैनिक आरंभ पर्व | "आपल्या विश्वासाचे वृत्तपत्र"